| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १९१ वा | गुरूवार दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## तुळजापुर तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त गावाला खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची भेट



तुळजापुर (प्रतिनिधी)- तालुक्यातील सलगरा (दि), वडगाव (देव), जवळगा (मे) होनाळा व काक्रंबा तसेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिके व घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली. शेतकऱ्यांची व्यथा जाणून घेतल्या.

तुळजापुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पावसामुळे प्रचंड नुकसान झाले असून काही दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने परत एकदा धाराशिव जिल्ह्यात रौद्ररूप धारण केले आहे.

मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. सध्या सोयाबीन पिकाचा हंगाम सुरू असून बऱ्याच ठिकाणी सोयाबीन काढण्यास सुरुवात केली आहे परतीच्या पावसामुळे उरले सुरले सोयाबीन देखील हातातून निघून जाण्याचे चिंता शेतकरी वर्गास भेडसावत असून शासनाकडून केवळ तुटपुंजी मदत जाहीर करण्यात आली असून प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे खासदार ओम प्रकाश राजा निंबाळकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

यावेळी शाम पवार ऋषीभैय्या मगर, ड श्री. ढवळे, गौरीशंकर गोडगिरे, शाम माळी, गोपाळ सुरवसे यांच्यासह परीसरातील शेतकरी, ग्रामस्थ व नागरीक मोठया प्रमाणावर उपस्थीत होते.

## लोकशाही दिनात आलेल्या तक्रारींचे तातडीने निराकरण करा -जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार




धाराशिव (जिमाका) जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी लोकशाही दिनाच्या अनुषंगाने नागरिकांच्या तक्रारींची तातडीने व प्रभावी सोडवणूक करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.तसेच दर महिन्याला तालुका व जिल्हास्तरावर लोकशाही दिन आयोजित केला जातो.नागरिकांनी प्रथम तालुकास्तरीय लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी.त्या ठिकाणी तक्रारींचे निराकरण झाले नाही तरच जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी,असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्रीमती.शफकत आमना, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.भंडे, कार्यकारी अभियंता श्री.केत, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. हर्षल डाके यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.पूजार म्हणाले की, नागरिकांच्या तक्रारी केवळ औपचारिकतेसाठी न घेता गंभीरतेने हाताळल्या पाहिजेत.तालुका पातळीवर तक्रारी निकाली काढल्यास नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचेल तसेच त्यांना न्याय मिळेल.असे ते म्हणाले.

आजच्या लोकशाही दिनात एकूण ११ तक्रारी प्राप्त झाल्या.यामध्ये -भूमी अभिलेख विभाग - १, मुख्याधिकारी धाराशिव - १,वीज वितरण कंपनी - १, तहसिलदार धाराशिव - १, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) - १,जिल्हा परिषद पंचायत विभाग - २,सहाय्यक निबंधक मुद्रांक व नोंदणी विभाग धाराशिव - २,तहसिलदार लोहारा - १, जिल्हाधिकारी कार्यालय नैसर्गिक आपत्ती विभाग - २,या तक्रारींचा समावेश आहे. यापूर्वी एकूण ३५ तक्रारी प्राप्त झाल्या. प्राप्त तक्रारींपैकी १७ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून १८ तक्रारींची कार्यवाही संबंधित विभागांमार्फत सुरू आहे.

## कळंब तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त गावाला खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची भेट



धाराशिव (प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील जवळा खुर्द देवळाली, वाठवडा, पाडोळी, ढोराळा व उमरा तसेच धाराशिव तालुक्यातील कोल्हेगाव येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिके व घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली. शेतकऱ्यांची व्यथा जाणून घेतल्या.

कळंब तालुक्यातील पाडोळी ( ना) येथील जोशी काका यांचे पावसामुळे दुर्दैवी निधन झाले असून त्यांना ग्रामीण रुग्णालय मुरुड येथे उपचारासाठी दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाला. कालच्या पावसाने जीवित हानी झाली असून ही दुर्दैवी घटना आहे.

कळंब व धाराशिव तालुक्यातील अनेक गावांमध्ये कालच्या पावसामुळे प्रचंड नुकसान झाले असून काही दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने परत एकदा धाराशिव जिल्ह्यात रौद्ररूप धारण केले आहे.मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. सध्या सोयाबीन पिकाचा हंगाम सुरू असून बऱ्याच ठिकाणी सोयाबीन काढण्यास सुरुवात केली आहे परतीच्या पावसामुळे उरले सुरले सोयाबीन देखील हातातून निघून जाण्याचे चिंता शेतकरी वर्गास भेडसावत असून शासनाकडून केवळ तुटपुंजी मदत जाहीर करण्यात आली असून प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे खासदार ओम प्रकाश राजा निंबाळकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## क्राईम न्युज

### प्राण्यांना निर्दयपणे कत्तल करुन मांस विक्री करण्यासाठी जवळ बाळगुन वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अमिर महेबुब शेख, वय २६ वर्षे, रा.काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०५.१०.२०२५ रोजी लोणखस शिवार एनएच ५२ रोडवर आयशर क्र एमएच १३ ए एक्स ४८९८ मध्ये ६ टन गोवंशीय जनावराचे मांस व हाडे एकुण ६,००,००० किंमतीचे व वाहनासह १०,००,००० किंमतीचे गोवंशीय जनावरांची निर्दयतेने कत्तल करुन मांस व हाडे विक्रीसाठी वाहतुक करत असताना वाशी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तीविरुध्द प्राणी संरक्षण अधिनियम ५(क), ९(ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत-महेश रा.क्रांतीचौक तुळजापूर ता. तुळजापूर जि.धाराशिव दि.०६.१०.२०२५ रोजी चेतना वाईन शॉपचे बाजूस अतिल रस्त्यावर अंदाजे १,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३० सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर बालाजी रा. बेंबळी ह.मु. सिंदफळ ता. तुळजापूर जि.धाराशिव हे दि.०६.१०.२०२५ रोजी सिंदफळ ब्रिजच्या बाजूला चिकनच्या दुकाना शेजारी अंदाजे १,१०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

### मोटार सायकलची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-समर्थ पुरुषोत्तम आवटे, वय २० वर्षे, रा. आसु ह.मु. हंसराज मठ परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची मोटरसायकल ही दि.२१.०८.२०२५ रोजी सु.न्यु कॉलेज गेटचे समोर परंडा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-समर्थ आवटे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथून मोटारसायकल चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी श्रीमंत बाबुराव मुळे, वय ४३ वर्षे, रा. शासकीय निवासस्थान आनंदनगर ता. जि. धाराशिव यांची १५,००० किंमतीची मोटरसायकल श्रीमंत मुळे यांचे राहते घरासमोरुन चोरुन नेली. श्रीमंत मुळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पूरग्रस्त भागात आरोग्य विभाग सज्ज : आरोग्य शिबिरे, प्रतिबंधात्मक उपाययोजना व विशेष पथकांची तयारी

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील अलीकडील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साथरोगांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन आरोग्य विभाग सज्ज झाला असून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

पूरग्रस्त भागात प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना करण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत ९ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये परंडा तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय परंडा,प्रा.आ.केंद्र अनाळा व जवळा,भूम तालुक्यात ग्रामीण रुग्णालय भूम,प्रा.आ.केंद्र वालवड व पाथरुड,कळंब तालुक्यात उपकेंद्र खामसवाडी तसेच धाराशिव तालुक्यात ग्रामीण रुग्णालय तेर व प्रा.आ.केंद्र पढोली येथे शिबिरे होत आहेत.

या शिबिरांमध्ये सर्व रोग तज्ञ,बालरोग तज्ञ,आयुष सेवा,मानसिक आरोग्य समुपदेशन,मोबाईल मेडिकल युनिट, रक्त तपासणी व मोफत औषध वितरण यांचा समावेश आहे.तसेच जिल्ह्यातील ५८ गावांमध्ये स्थानिक पातळीवर आरोग्य शिबिरे घेण्यात येत आहेत.

साथरोग प्रतिबंधासाठी १ कोटीची तरतूद करून सदर निधी जिल्हा समितीकडून पंचायत समिती स्तरावर वितरित करण्यात आला आहे.या निधीतून औषध खरेदी,धूर फवारणी, पाणी शुद्धीकरण,डास प्रतिबंधक औषधे (अबेट) इत्यादी उपाययोजना राबविल्या जात आहेत.

डॉ.विजय कंदेवाड,संचालक (आरोग्य सेवा) पुणे यांनी ५ व ६ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाचा दौरा करून आरोग्य शिबिरे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेतला.

तसेच ५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार, आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी सर्व गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन निधीचा योग्य वापर करून आवश्यक औषधी खरेदी,फॉगिंग मशीन दुरुस्ती, पाणी शुद्धीकरण यावर भर देण्याचे निर्देश दिले आहे.

जिल्ह्यात साथरोग नाही,नागरिकांना आवाहन करण्यात येते की,सद्यस्थितीत जिल्ह्यात कोणत्याही भागात साथरोगजन्य परिस्थिती नाही,अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

नागरिकांनी स्वतःची काळजी घेत उकळलेले अथवा क्लोरीन टाकलेले पाणी पिणे,व्यक्तिगत व परिसराची स्वच्छता राखणे,मच्छरदाणीचा वापर करणे,तसेच ताप,उलटी,अतिसार,त्वचेवर फोड इत्यादी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी केले आहे.

## वडगाव (लाख) ग्रंथालयाला अनुदान नियमाप्रमाणेच वितरित- ढाकणे

धाराशिव दि.८ ऑक्टोबर (जिमाका) तुळजापूर तालुक्यातील वडगाव (लाख) येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाने शासनमान्य निकषांनुसार नियमितपणे कार्य करत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अलीकडेच या ग्रंथालयाने अनुदान लाटल्याचा आरोप श्री. गणेश लगदिवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २ ऑक्टोबर रोजी केलेल्या उपोषणातून केला होता.

तथापि, संबंधित अर्जामध्ये या ग्रंथालयाचा उल्लेखच नाही.तसेच वडगाव (लाख) येथील ग्रामविकास अधिकारी व गावातील ग्रामस्थांनी स्वाक्षरीसह पत्र व छायाचित्राद्वारे ग्रंथालय कार्यरत असल्याची पुष्टी केली आहे.

सन २०१२ साली महसूल विभागामार्फत झालेल्या राज्यस्तरीय पडताळणीत हे ग्रंथालय कार्यक्षम आढळले होते.त्यानंतर २०१३ पासून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत दरवर्षी तपासणी केली जाते व तपासणीतही ग्रंथालय सातत्याने कार्यरत असल्याचे निष्पन्न झाले आहे.यामुळे मागील दहा-बारा वर्षांपासून अनुदान लाटल्याचा आरोप चुकीचा आहे.

सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना परीरक्षण अनुदान थेट संचालनालय,मुंबईमार्फत ग्रंथालयांच्या बँक खात्यात जमा केले जाते. त्यामुळे अधिकारी व ग्रंथालय चालक यांचे संगनमत असल्याचा, तसेच अनुदान लाटल्याचा आरोप निराधार असल्याचे श्री.ढाकणे स्पष्ट केले आहे.

श्री.गणेश लगदिवे यांची तक्रार आकस,वैयक्तिक वाद व वित्तीय हेतूमधून केली गेली असावी असेही जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. ढाकणे यांनी नमूद केले आहे. नियमित वार्षिक तपासणीमध्ये सदर ग्रंथालय कार्यक्षम आढळून येत असल्याने सर्व आरोप निष्फळ ठरत असल्याचे श्री.ढाकणे स्पष्ट झाले आहे.

## सैनिकी मुलांचे वसतीगृह येथे तात्पुरत्या सहायक वसतिगृह अधिक्षक पदासाठी माजी सैनिकांना संधी

धाराशिव (जिमाका) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सैनिकी मुलांच्या वसतीगृह,धाराशिव येथे तात्पुरत्या स्वरूपात अशासकीय सहायक वसतिगृह अधिक्षक पद भरावयाचे आहे.हे पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असून मानधन एकत्रिक स्वरूपात दिले जाणार आहे.

या पदासाठी जिल्ह्यातील पात्र व इच्छुक माजी सैनिक ( माजी सुबेदार / सुबेदार मेजर) यांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह - डिस्चार्ज बुक,पी.पी.ओ.,माजी सैनिक ओळखपत्र तसेच शैक्षणिक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२५ सकाळी १०.०० वाजेपर्यंत असून,अर्ज व कागदपत्र तपासणीनंतर त्याच दिवशी दुपारी ११ वाजता मुलाखत घेण्यात येईल, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी दिली आहे.अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७ / ७५८८५२७५५४ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## माजी अधिकारी व जेसीओसाठी सुवर्णसंधी

धाराशिव दि.८ ऑक्टोबर (जिमाका) महाराष्ट्र राज्यातील शासकीय तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तांत्रिक विद्यालयात दैनंदिन चार ते सहा तासांसाठी समन्वयक पदासाठी सेनादलातून सेवानिवृत्त अधिकारी व जेसीओंची नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थांकडून मानधन देण्यात येणार आहे.या उपक्रमामुळे निवृत्त अधिकाऱ्यांना व जेसीओंना आपल्या अनुभवाचा उपयोग समाजोपयोगी कार्यासाठी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

इच्छुकांनी आपल्या नजीकच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सेवा देण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे संपर्क साधावा.संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७ / ७५८८५२७५५४ उपलब्ध आहेत.

तसेच इच्छुकांनी https://forms.gle/UM7ivf7fMZVTZa3V9 या गूगल फॉर्ममध्ये आपली माहिती भरून १५ ऑक्टोबर २०२५ पूर्वी पाठविणे आवश्यक आहे. हा फॉर्म महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या https://msbsvet.edu.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काही बाबीचा विचार केला पाहिजे

देशातील जनतेच्या अपेक्षा काय आहेत. त्यांना काय हवे आहे याचा विचार केला पाहिजे. ते न करता, कारण नसताना काही बाबी घडत आहेत. जीएसटी कमी केल्याने अधिक सकारात्मक परिणाम होईल असे वाटले होते तोही फारसा दिसून आला नाही. गोर-गरीब जनता ज्या वस्तूची जीएसटी शुन्य केली आहे तीच वापरच करीत नव्हते. जसे पनीर वगैरे! सर्वसाधारण जनतेला काय हवे आहे तर रोजची रोटी, त्याला लागणारे पदार्थ, तेल वगैरे, याच्या किंमतीत काय फरक दिसून आला या बाबत चिंतन झाले पाहिजे. दोन किंवा चार चाकी गाड्या नवीन कोण घेणारे आहेत. मध्यम व गरीब वर्ग हा जुन्या वापरलेल्या गाडया वापरतो कारण त्या स्वस्तात मिळतात. दरवर्षी गाड्या बदलणारे कोण आहेत. याचा विचार केला तर अनेक बाबी कळून येतात. त्यामुळे आजही जनता कमी समाधानी आहे. दुसरी बाब म्हणजे निसर्ग कोपल्याने अतिवृष्टी यावर्षी झाली. उन्हाळ्यात पाऊस झाला. याला जबाबदार कोण? यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. निसर्गाचा ऱ्हास करणारे सर्वजनच जबाबदार आहोत. रस्त्यात झाड आले कापून टाका. शेतातील झाडामुळे जमीन पडीक राहाते मग टाका विकून. अशा अनेक बाबीमुळे ज्या निसर्ग निर्मित बाबी आहेत त्याचा नाश मानव करीत आहे. आज सांगा झाड तोडले त्याला मोठी शिक्षा झाली का? मोठ्या प्रमाणात आरी गिरण्या चालतात, याकडे वन विभागाचे लक्ष आहे का? मुळीच नाही. पुर्वीपेक्षा वनराई किती शिल्लक आहे. याचा विचार केला पाहिजे. याचा सर्वे केला पाहिजे. राज्यात माणसाबरोबर जनावरांचा सर्वे केला जातो, मात्र निसर्गाचा होत नाही. वास्तविक डोंगरावर किंवा रस्त्याच्या कडेला झाडे लावले जात नाहीत तर आपोआप उगविली जातात. सुंदर अशी दुतर्फी झाडे तोडली जातात हे प्रशासनास दिसून येत नाही का? मुळात कडक धोरणाचा आवलंब होत नाही. जोपर्यंत निसर्गाचा मोठा ऱ्हास थांबणार नांही तो पर्यंत निसर्गाचे संतुलन बिघडणार आहे त्यामुळे प्रत्येक बाबीचा विचार केला पाहिजे. हे झाले निसर्गाबाबत, आता तर सणाचे दिवस असून कोणतीही वस्तू स्वस्त नाहीत. सरकारला बऱ्याच बाबी माहिती असतात मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जाते. भारतातील यंत्रणा सक्षम असली पाहिजे. सुटसुटीतपना असला पाहिजे. यंत्रणा व्यवस्थित राबविली जात नसल्याने जनतेत नाराजी दिसून येते. आज सरकारी कार्यालयात सर्वांची कामे होतातच असे नाही. सरकारी कर्मचाऱ्यास जो पगार मिळातो तो कशासाठी तर जनतेची कामे व्हावीत म्हणून! ती होतात का? याबाबत मुल्यमापन होताना दिसून येत नाही. ते केले पाहिजे. किती कर्मचारी वेळेवर उपस्थिती राहातात व जनतेच्या कामाचा निपटारा होतो या बाबत मुल्यमापन होत नाही. आज आपल्या देशात 'आंधळे दळत आहे व कुत्रे पिठं खात आहे' अशी स्थिती आहे. यातून कधी परिस्थिती सुधारेल हे सांगता येत नाही. यंत्रणाच एवढी खिळखिळी झाली आहे की, ती पुर्वपदावर येईल असे वाटत नाही. त्यामुळे यंत्रणेत सुधारण होऊ शकेल तशा मानसिकतेची यंत्रणा निर्माण केली पाहिजे. केवळ दिवस जावा व पगार घट्ट! असा विचार थांबविण्याची गरज आहे. बाजारात अनेक वस्तू अशा आहेत की, त्या मनमानेल दराने विक्री होतात. त्यावर निर्बंध कोणाचे तरी असले पाहिजे. ते दिसून येत नाहीत, यात सुधारणा करावयाची झाली तर ग्रामीण भागातून केली पाहिजे. आज पूरग्रस्त, ढगफुटी, अवेळी पडणारा पाऊसाचे संकट ही निसर्गनिर्मित नाही तर मानव निर्मित आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. देशात मुलभूत बाबीकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. आज राज्यात मोठे संकट हे शेतकऱ्यावर आले आहेत. हे मान्यही केले जाते. या संकटावर मात करण्यासाठी अजूनतरी पुढे कोणी आले नाही. या संकटाबाबत चर्चा किंवा मात करण्याबाबत विचार होताना दिसून येत नाही. केवळ अनुदान, नुकसान भरपाईची मागणी होत आहे. राज्यातच काय देशात विरोधकांची जी जरब पाहिजे ती दिसून येत नाही. देश पातळीवर बिनबुडाचे आरोप विरोधीपक्षाकडून होतात. त्याला जनतेचा पाठींबा किती मिळतो किंवा जनता पेटून किती उठते याचा विचार केला जात नाही. विरोधक आपली दैना कशामुळे व कोणत्या कारणामुळे झाली या बाबत चिंतन होत नाही. दोष दुसऱ्याला दिले जातात, मात्र आपल्यात सुधारणा होत नाही. ही वस्तूस्थिती कोणी नाकारू शकत नाही. पुर्वी जसे समाधानी व्यक्ती होते ते आता का नाहीत तर अपेक्षेपेक्षा गरजांची वाढ झाली आहे. त्याच्या पुर्ततेसाठी वाट्टेलतो मार्ग निवडला जातो आहे. यावर निर्बंधाची मोठी गरज आहे. पुर्वी सारखी परिस्थिती निर्माण करावयाची झाली तर पहिल्यांदा यंत्रणेत सुधारणा करावी लागेल. हे काम तसे सोपे नाही तर आवघड आहे. आज केवळ मागणे चालू आहे. जेवढा मोबदला मिळतो तेवढे काम केले जाते का? हे पाहिले जात नाही. एखाद्याला सॅलरी पन्नास हजार काय एक लाख करा मात्र त्या बदल्यात तो प्रामाणिक जनतेच्या कामे करतो का? वेळवर येतो का? किती कामाचा निवटारा झाला याचे कधीतरी मुल्यमापन होणे अपेक्षित आहे. केवळ आणि केवळ मुल्यमापन होत नसल्याने देशाची प्रगती खुंटली जात आहे. जो तो नाराज आहे, अल्पसंतोषी आहे. त्यामुळे अशीच परिस्थिती राहीली तर एक ना एक दिवस असंतोषाचा भडका उडाल्याशिवाय राहाणार नाही. त्यावेळी परिस्थिती हाताळणे आवघड होणार आहे. त्यामुळे वेळीच परिस्थितीत सुधारणा अपेक्षित आहे. निसर्गाचा ऱ्हास सक्तीने थांबविला पाहिजे. तरच सुखाचे दिवस येतील. नसता अशीच परिस्थिती राहीली तर नैसर्गिक संकटे मोठी येतील त्याची चाहूल काही प्रमाणात लागली आहे. ढगफुढी, पूरस्थिती, मातीच वाहून जाणे, रस्ते-पुलाचे मोठे नुकसान, अशा विविध संकटे हे येत आहेत. ही संकटे सांगून येत नाहीत तर क्षणात होते का नव्हते हे देखिल कळून येणार नाही. निसर्ग पाऊस दहा मिनटे जोरदार पडला तर पाणीच पाणी करू शकतो. क्षणात भुकंप होऊ शकतो. सर्व काही गडप होवू शकते. कोणाला ही छेडा मात्र निसर्गाला नका. निसर्ग हा मोफत अनेक बाबी देणारा आहे. त्या बाबी कृत्रिमरित्या बनविता येवू शकत नाहीत, या बाबीचा विचार करावा. काही बाबी छुल्लक असल्यातरी मानवासाठी हानीकारक ठरू शकतात त्यामुळे वेळीच विचार केला पाहिजे.

# मुंबईची नव प्रभात: भारत-ब्रिटन संबंधांसाठी 'ब्रिस्क' युगाची सुरुवात

**मूंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. 'ग्लोबल फिनटेक फेस्ट'च्या भव्य समारोपाकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.**

**ऐतिहासिक वळण:** 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' २०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप'चे रूप मिळाले आहे. 'भारत-यूके व्हिजन २०३५' या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे. हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे. देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला 'व्यापक आर्थिक आणि व्यापार करार' आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटींनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील. या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे.

हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते. या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत.

हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या 'व्यवसाय सुलभतेचे' भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते.

प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे 'व्यवसाय सुलभतेचे' हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो.

या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.

हिंद-प्रशांतमध्ये सुरक्षा बंधन मजबूत करणे ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे जे 'व्हिजन २०३५'च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे.

अलीकडील नौदल सराव 'कोंकण २०२५'मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते.

भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे.

याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा 'संरक्षण औद्योगिक रोडमॅप' खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

**'लिव्हिंग ब्रिज':** चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी धोरणात्मक करारांपलीकडे, 'लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी 'लिव्हिंग ब्रिज' या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा ( स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात. २०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

'व्हिजन २०३५'च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे. याला पूरक म्हणून, भारत-यूके 'ग्रीन स्किल्स' भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये तरुणांची क्षमता विकसित करते - ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते.

तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो.

डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो.

'तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमा' द्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे. हवामान कृती हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी आणि शेल यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

नव्या युगाची सुरुवात प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाहीतर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

**ब्रिजेश सिंह (भा.पो.से.),**
**प्रधान सचिव तथा महासंचालक**
**(माहिती व जनसंपर्क).**

# रात्री झोपण्यापूर्वी साजूक तुपाने असा करा पायाच्या तळव्यांना मसाज

साजूक तूपाचे सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. गायीचे तुप जेवणात वापरल्यास शरीराला अनेक फायदे मिळतात. पण तुम्हाला माहित्येय का साजूक तुपाने पायाच्या तळव्यांना मालिश करणे खूप जास्त फायदेशीर ठरु शकते. रात्री झोपताना तळव्यांना साजूक तुपाने मालिश केल्यास तुमच्या चेहऱ्यावर ग्लो येईल. तुम्हाला हे ऐकायला कदाचित विचित्र वाटत असेल तरी हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते. पायाच्या तळव्यांना शुद्ध तुपाने मसाज केल्यास काय फायदे मिळतात हे जाणून घ्या.

अपुरी झोप

रात्री झोपण्याच्या आधी तळव्यांना मालिश केल्यास अनिद्रेपासून आराम मिळतो. झोप न येणे या समस्येने हैराण झाला असाल तर नैसर्गिकरित्या झोप येण्याचा हा एक चांगला पर्याय आहे. तूप थोडेसे गरम करुन पायाच्या तळव्यांना मालिश केल्यास पायातील रक्ताभिसरण सुरळीत होते. त्यामुळं शरीराला अनेक फायदे मिळतात तसंच, झोप येण्यास मदत होते.

त्वचेसाठी फायदेशीर

शुद्ध तुपात अँटीऑक्सिडेंटची मात्रा भरपूर प्रमाणात असते. त्वचेसाठी हे खूप फायदेशीर असते. पायाच्या तळव्यांना शुद्ध तुपाने मसाज केल्यास त्वचा उजळते. तसंच, त्वचा नाजूक आणि ग्लोइंग बनण्यासही फायदेशीर मदत करते. त्याचबरोबर चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि काळे डाग कमी करण्यासही मदत होते.

तळव्यांवर वेगवेगळ्या ठिकाणी अॅक्युप्रेशर पॉईंटस असतात. साजूक तुपाने तळव्याची मालिश केल्यास अॅक्युप्रेशर पॉइंटस दाबले जातात. शरीरातील रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी पायाच्या तळव्याची मालिश करणे फायदेशीर ठरतं.

शरीरात वात दोष बिघडल्यास आजारांचा धोका संभवतो. त्यामुळं झोपण्यापूर्वी साजूक तुपानं हाताच्या तळव्यांना मालिश केल्यास शरीरातील वात संतुलित राखण्यास मदत होते.

तुपाने मॉलिश कशी करणार

मॉलिश करण्यासाठी सगळ्यात पहिले शुद्ध साजूक तूप थोडेसे गरम करा. त्यानंतर तुमच्या पायाच्या तळव्यावर आणि अंगठ्याच्या आजूबाजूला लावून चांगल्या पद्धतीने मालिश करा. १० ते १५ मिनिटे हाताने मसाज करा. शुद्ध तुपामध्ये व्हिटॅमिन ए, ई आणि क आढळतते. त्यामुळं ताणतणाव कमी होण्यास मदत होते.

# बचतगटाच्या मदतीतून रचला संगिता कोळींनी 'सरस' पाया

महिला ही कुटुंबाची केंद्रबिंदू असून तिच्या शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन आणि आत्मविश्वासावर संपूर्ण कुटुंबाचे भवितव्य अवलंबून असते. यामुळेच महिलांचे सक्षमीकरण हे प्रगत समाजाचे लक्षण मानले जाते. त्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना व स्वयंसेवी संस्था प्रयत्नरत आहेत. मात्र, अशा संधीचा उपयोग करून स्वत:ची वेगळी वाट निर्माण करणाऱ्या महिलाच खरी समाजपरिवर्तनाची गाथा लिहितात. वाळवा तालुक्यातील कारंदवाडीच्या संगिता रामचंद्र कोळी यांनी ही प्रेरणा सर्वासमोर ठेवली आहे. संगिता कोळी यांचा स्वीट कोकम, काजू, बेदाणा व सुका मेवासाठीचा ''सरस'' हा ब्रँड आता राज्य-परराज्यात सरस ठरला आहे. १२०० रूपयांच्या कर्जापासून सुरू झालेला हा प्रवास आज वार्षिक २५ लाख रूपयांच्या उलाढालीवर येऊन स्थिरावला आहे. गेल्या ३५ वर्षातील संघर्ष, जिद्द, चिकाटी व परिश्रम यांच्या पायावर संगिताताईंनी ही भरारी घेतली आहे.

याबाबत संगिता कोळी म्हणाल्या, माहेरची परिस्थिती बेताची असल्याने दहावी झाल्यावर १९९० मध्ये लगेच माझे लग्न करण्यात आले. माझे पती पदवीधर होते. मात्र नोकरी नसल्याने ते व सासू, सासरे शेतीमध्ये रोजंदारीवर जायचे. त्यांच्यासोबत मीही रोजंदारीवर जावू लागले. रोजंदारी करत करत आठवडी बाजारात भाजी विकण्याचेही काम मी १९९५ पर्यंत केले. दरम्यान माझ्या दोन मुलांचा जन्म झाला. त्यानंतर मला स्वत:चा व्यवसाय करावा, असे वाटायचे. माझ्या मामांनी मला प्रोत्साहन दिले व बेदाणा विक्रीचा सल्ला दिला, असे त्यांनी सांगितले. १९९५ च्या दरम्यान तासगाव येथून बेदाणा खरेदी करून त्या सांगलीतील गणपती पेठेत विकत असत आणि पुन्हा सायंकाळी कारंदवाडीला परतत असत. हे करताना तीन वर्षाचा एक आणि तीन आठवड्यांचा एक अशी स्वत:ची दोन चिमुकली मुले सोबत घेऊन त्यांनी हा प्रवास केला. दोनच वर्षात त्या या बेदाणा विक्रीच्या व्यवसायात तरबेज झाल्या. त्यानंतर मामांच्या पावलावर पाऊल ठेवत जागतिक पर्यटन केंद्र असलेल्या महाबळेश्वर येथे रस्त्यावर बसून बेदाणा विक्री करण्यास त्यांनी सुरवात केली.

नवसहस्त्रक उजाडताना संगिता कोळी यांना व्यवसायवाढीचे वेध लागले. २००३ च्या आसपास त्या तत्कालिन वीराचार्य व नामकरणानंतर आताच्या ज्ञानदा महिला स्वयंसहायता बचत गटाच्या सदस्या झाल्या. बचत गटाच्या माध्यमातून त्यावेळी त्यांना बाराशे रूपयांचे कर्ज मिळाले. त्यातून त्यांनी काजू प्रक्रियेचे यंत्र खरेदी केले. त्यासाठी काजू प्रक्रियेचे रीतसर प्रशिक्षणही घेतले आणि सांगली जिल्ह्यातील पहिला नोंदणीकृत काजू प्रक्रिया प्रकल्प सरस या नावाने त्यांनी सुरू केला. इथेच त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. आणि त्यांनी पुन्हा मागे वळून बघितले नाही.

संगिता कोळी म्हणाल्या, बचत गटाच्या मदतीनंतर हुतात्मा सहकारी बँक, आष्टाच्या मदतीने मला बीजभांडवल म्हणून ४५ हजार रूपयांचे कर्ज मिळाले. त्यातून मी बेदाणे, काजूबरोबर सुका मेवाही विकू लागले. साधारण १५ वर्षापूर्वी एका प्रयोगातून मला आमच्या स्वीट कोकमचे उत्पादन गवसले आणि हीच आमची आज स्पेशालिटी आहे. बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक राज्यात आमचे सरस स्वीट कोकम विक्रीसाठी उपलब्ध आहे. पूर्ण देशभरात स्वीट कोकम हे आमचेच प्रॉडक्ट आहे, असा दावा त्यांनी केला आहे.

प्रसंगी घाटातून पिकअप शेड चालवले. वाहनातून ५० किलोची पोती घरी उतरवली. कारंदवाडी, तासगाव, सांगली ते पुन्हा कारंदवाडी असा दर दिवशी प्रवास केला, हे जुने प्रसंग सांगताना संगिताताई आजही गहिवरतात. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील महिला असूनही कच्चा माल खरेदीसाठी त्या एकटीने विमानप्रवास करतात.

बाजारपेठ ओळखून महाबळेश्वर हे विक्रीचे ठिकाण म्हणून निवडले. सातत्याने मेहनत, दर्जेदार मालाची जपणूक आणि ग्राहकांशी विश्वासार्ह संबंध याचबरोबर मालाचा दर्जा व दर यांची योग्य सांगड घातल्यामुळे विक्रीत वाढ झाल्याचे गमक असल्याचे संगिता कोळी सांगतात.

बचत गटाच्या १२०० रूपये कर्जापासून सुरू झालेला प्रवास आज वार्षिक २५ लाखाच्या उलाढालीपर्यंत येऊन पोहोचला आहे. कारंदवाडी येथील युनिटमध्ये उत्पादन निर्मिती आणि महाबळेश्वरसह प्रत्येक राज्यात विक्री करण्यात त्यांचा जम बसला आहे. महाबळेश्वर येथे त्यांनी स्वत:चे घरही घेतले आहे. पती, दोन मुलांसह सुना, नातवंडे असे कौटुंबिक पसारा वाढून संगिता कोळी यांचे दहा सदस्य आहेत. मुलं आणि सुनाही आता त्यांच्या कारभारास हातभार लावत आहेत. संगिता कोळी यांनी आपली प्रगती साधताना आपल्या व्यवसायातून १० ते १५ महिलांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. यातून त्यांनी अनेक कुटुंबांची आर्थिक घडी मजबूत केली आहे.

त्यांच्या उपक्रमाला माविम व नाबार्डसारख्या संस्थांचेही पाठबळ लाभले आहे. सांगली, पुणे, मुंबई येथे झालेल्या प्रदर्शनांमध्ये त्यांच्या बचत गटाने सहभाग घेतला. या प्रदर्शनांमुळे त्यांच्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळालीच, पण इतर महिलांनाही विक्री कौशल्ये, मार्केटिंग व ग्राहकांशी व्यवहार करण्याचे प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. फक्त व्यवसायापुरतेच मर्यादित न राहता त्यांनी सम ाजकार्याची जबाबदारीही जोपासली आहे. 'महाबळेश्वर ट्रेकर' या संघटनेतील त्या एकमेव महिला सदस्य असून, त्यांनी महापूर व इतर आपत्तीच्या काळात पोलिस व प्रशासनाला विनामोबदला मदत केली आहे. त्यांच्या या कार्यातून सामाजिक भान, संघटन कौशल्य आणि समाजाशी असलेली नाळ याची प्रचिती येते.

बचत गटाच्या महिलांशी संवाद साधताना संगिता कोळी यांच्या व्यवसायाचा पाया रचला गेला. जीवनाला दिशा मिळाली. आत्मविश्वास वाढला. बचत गट हा फक्त बचतीपुरता नसून, आपले आर्थिक सबलीकरण करून सामाजिक उन्नतीसाठी मदत करू शकतो, हे त्यांनी जाणले. त्यामुळे आजही स्वतंत्र व्यवसाय करताना त्या बचत गटाच्या सक्रिय सदस्या आहेत. एकूणच संगिता कोळी यांच्या कार्याने महिलांना धैर्य, आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची दिशा दिली आहे.

**– संप्रदा बीडकर**

# वारंवार पेनकिलर घेत असाल तर



मुंबई : थंडीच्या दिवसात हवामानात झपाट्याने होणाऱ्या बदलांचा अनेकांच्या तब्येतीवर परिणाम होतो. अंगदुखी, ताप यांसारख्या समस्या जाणवतात. अशा वेळी अनेकजण आपल्याजवळ वेदनाशामक औषधांचा साठा ठेवतात, जेणेकरून लागल्यास त्यांचा उपयोग करून लगेच आराम मिळवता येईल. परंतु ही सवय चांगली नाही, कारण किरकोळ वेदनांवरही जर पेन किलर घेत राहिलात, तर भविष्यात याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

आजकालच्या जलद जीवनशैलीत अनेकांना स्वतःच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यास वेळ मिळत नाही. दुखू लागल्यावर वेदनाशामक औषधांचा वापर करून दुखणं तात्पुरते थांबवण्याची सवय नेहमीच असते. पण, हे करणं अत्यंत चुकीचं आहे. विशेषतः थंडीच्या दिवसांत डोकेदुखी किंवा अंगदुखी होत असताना लगेच पेन किलर घेणं तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकते.वेदनाशामक औषधांचा वापर हानिकारक आहे. जर तुम्ही पेन किलर वारंवार घेत असाल, तर यामुळे अनेक आरोग्यसमस्यांचा सामना करावा लागतो.

अपचन: तज्ज्ञांच्या मते, पेन किलरचे अति सेवन केल्यास पोटाशी संबंधित गंभीर समस्या उद्भवू शकतात. गॅस, सिडिटी, अल्सर आणि गॅस्ट्रिक रक्तस्राव होण्याचा धोका वाढतो.किडनीच्या समस्या: पेन किलरचे वारंवार सेवन केल्याने किडनीमध्ये त्याचे बारीक कण जमा होऊ शकतात, ज्यामुळे किडनी स्टोन, किडनी निकामी होणे यांसारखी गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

स्नायू कमकुवत होणे: सतत पेन किलर घेतल्याने स्नायू कमकुवत होतात आणि हृदयाचे अनियमित ठोके आणि थकवा यासारखी लक्षणे दिसू शकतात, जे थंडीत अधिक तीव्र होऊ शकतात.

म्हणूनच, पेन किलरचे सेवन शक्यतो टाळा आणि आरोग्याच्या गंभीर समस्यांपासून वाचण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच औषध घेतले पाहिजे.

# कफ सिरप ठरतोय जीवघेणा तर..

मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये कफ सिरपमुळं तब्बल १८ चिमुकल्यांनी प्राण गमावले आहेत. संपूर्ण भारतात या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. तसंच, बालकांच्या मृत्यूनंतर नागरिकांमध्ये चिंतादेखील वाढली आहे. तसंच, सध्या वातावरणात बदल होतोय. आता पावसाळा संपून ऑक्टोबर हिटची जाणीव व्हायला लागली आहे. अशावेळी वातावरण बदलाचा परिणाम आपसूकच आरोग्यावर होतो. वातावरण बदलामुळं खोकला, गळ्यात खवखव अशा समस्या निर्माण होतात. अशावेळी खोकल्याचे औषध घेण्याचा सल्ला दिला जातो. गळ्यात खवखव, सर्दी -शिंका आणि सातत्याने रोगप्रतिकार शक्तीवर परिणाम होतो. त्यामुळं अनेकजण खोकल्याचे औषध घेतात. मात्र तुम्ही खोकल्याचे औषध न घेता नैसर्गिक व घरगुती उपायदेखील करु शकता. ज्यामुळं सर्दी- खोकल्यावर आराम मिळेल. आयुर्वेदात काही उपाय खूपच गुणकारी आहेत. जे तुमच्यासाठी फारच फायदेशीर ठरू शकतात. तसंच, तुमची रोगप्रतिकार शक्तीदेखील वाढू शकते. सर्दी-खोकल्यापासून आराम देणारे उपाय

आलं आणि मधाचे मिश्रण

आल्यामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी गुण असतात आणि मध खशाला आराम देते. तुम्ही एक चमचा आल्याचा रस घेऊन त्यात एक चमचा मध मिसळा. दिवसातून २-३ वेळा हे मिश्रण घेतल्याने घशातील खवखव आणि खोकला बरा होतो. तुळस आणि काळीमिरीचा चहातुळशीच अँटी बॅक्टेरीयल गुण असतात आणि काळीमिरीत कफ बाहेर काढण्यास मदत करते.

# वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता



माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये वृद्ध सन्मान किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले, तर वृद्धांचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील.

भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत वृद्धांना आदर, संरक्षण आणि कुटुंबीय जबाबदारीचे स्थान दिले गेले आहे; परंतु अलीकडील राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संचालनालयाच्या (एनसीआरबी-२०२३) अहवालातील आकडेवारीने आणि त्यावर आधारित विविध माध्यमांच्या अभ्यासाने दर्शविले आहे की वृद्धांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांचे स्वरूप, प्रमाण आणि प्रसार यामध्ये लक्षणीय बदल होत आहेत. हे बदल फक्त वैयक्तिक पातळीवरील गुन्हेगिरीचे स्वरूप नाहीत, तर त्या समाजाच्या कुटुंबसंरचना, आर्थिक व्यवस्था, तंत्रज्ञानवापर आणि प्रशासनाच्या प्रतिसादाचे प्रतिबिंब आहेत. २०२३ मध्ये देशात वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्हे प्रकरणांची एकूण संख्या २७,८८६ इतकी नोंदली गेली आहे, जी २०२२ मधील वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या २८,५४५ गुन्हे प्रकरणांपेक्षा किंचित घट दर्शवते; मात्र हा सांख्यिकीय आकडा स्वतःमध्ये धोका कमी झाल्याचे दर्शवितो असे मानण्यासारखे नाही तर खरं चित्र खोल आणि मिश्र आहे कारण घट असलेल्या काही घटकांच्या पलीकडे गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण, राज्यनिहाय भिन्नता आणि डिजिटल व आर्थिक फसवणुकीत वाढ अशा धोकादायक प्रवृत्त्या दिसून येत आहेत. या आकडेवारीच्या प्राथमिक विश्लेषणात दिसते की, वृद्धांविरुद्ध नोंदलेल्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण 'साधे दुखापत' किंवा शारीरिक अत्याचारांचे आहे, परंतु त्याचवेळी चोरी, ठगी/बनावट/फसवणूक आणि आर्थिक शोषण या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांनी मोठ्या प्रमाणावर वृद्धांना लक्ष्य केले आहे, हे विशेषतः महत्त्वाचे आहे. कारण आर्थिक शोषण हे वृद्धांची आत्मनिर्भरता आणि मानसिक स्वास्थ्य यांना परावृत्त करते व सामाजिक पुनर्वसन ही कठीण करते.

राज्यस्तरावरचे विश्लेषण असे दर्शवते की काही राज्ये आणि महानगर वारंवार उच्च नोंदीसह समोर येत आहेत; एनसीआरबी-आधारित २०२३ आकडेवारीनुसार मध्य प्रदेशमध्ये ५,७३८ प्रकरणे नोंदली गेली आणि महाराष्ट्रात ५,११५ प्रकरणे नोंदली गेली, तर तामिळनाडू व कर्नाटकसह इतर काही राज्यांतही वृद्धांविरुद्ध प्रकरणांचे प्रमाण उच्च राहिले आहे. यामुळे ह्या प्रदेशांतील स्थानिक सामाजिक रचना, कुटुंबीय संघर्ष, आर्थिक असमानता आणि पोलीस व प्रशासनाच्या प्रतिसादातील फरक या सर्वांचा सखोल अभ्यास आवश्यक होतो.

महानगरांमध्येही वृद्धांविरुद्धचे गुन्हे महत्त्वाचे आहेत; दिल्ली, बंगळूरू आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्ध नोंदवलेली प्रकरणे वारंवार उच्च आढळतात व मोठ्या शहरांतील विभक्त कुटुंबसंरचना, सामाजिक अलगापन व सार्वजनिक ठिकाणी असलेली असुरक्षितता यांचा वृद्धांच्या अतीव संवेदनशीलतेशी सुसंगत संबंध आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने ह्या समस्येचे मूळ अनेक स्तरांवर आहे. पहिले आणि सर्वात थेट कारण म्हणजे कुटुंबरचना आणि पिढीगत बदल-पारंपरिक संयुक्त कुटुंबापासून विभक्त आणि एकल-व्यक्ती कुटुंबाकडे गेलेली बदलती प्रवृत्ती वृद्धांना वैयक्तिक तसेच सामाजिक आधारापासून वंचित करते; ज्यामुळे अनेक वृद्ध एकटेपणाचा अनुभव घेतात, नियमित सामाजिक निरीक्षण कमी होत म्हणून शारीरिक आणि आर्थिक शोषणाचे धोके वाढतात. दुसरे कारण, आर्थिक असुरक्षितता-अनेक ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न मर्यादित पेन्शन, बचत वा कौटुंबिक अवलंबित्वावर अवलंबून असते; अशा आर्थिक निर्भरतेमुळे ते नातेवाइकांद्वारे होणाऱ्या दडपणाचे आणि मालमत्तेवरील दबावाचे लक्ष्य बनतात. तिसरे कारण, सामाजिक प्रतिष्ठेच्या अभावामुळे वृद्धांचे स्थान कमी झाले आहे; कामावरून निवृत्त झालेल्या व्यक्तींना कुटुंबात व समुदायात कमी महत्त्व दिले जाणे, त्यांची मते दुर्लक्षित होणे आणि निर्णय प्रक्रियेपासून त्यांना वगळणे ह्या सर्वांचा मानसिक व सामाजिक परिणाम गंभीर स्वरूपाचा असतो. चौथे कारण, तंत्रज्ञान आणि डिजिटलीकरणामुळे निर्माण झालेले नवीन प्रकारचे धोके-ऑनलाइन बँकिंग, मोबाइल पेमेंट्स, ओटीपी व कॉल स्कॅम्स यांनी वृद्धांना आर्थिक फसवणुकीसाठी अतिशय संवेदनशील केले आहे; त्यांची डिजिटल साक्षरतेची कमतरता आणि अगदी विश्वसनीय वाटणाऱ्या प्लॅटफॉर्म्सचा गैरवापर या प्रक्रियेला चालना देतो. पाचवे आणि अत्यंत निर्णायक कारण म्हणजे न्यायप्रणाली आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेत असलेली कमकुवतता-जरी चरळप-ंशिपरपलश रपव थशश्रषरीशेष झरीशपीीं रपव डशपळी उळींळूशपी -लीं, २००७ सारखे कायदे अस्तित्वात असले तरी प्रत्यक्ष तक्रार नोंदविणे, पोलिसांच्या संवेदनशीलतेची कमतरता, आरोग्यामुळे पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचण्याची अडचण आणि न्यायप्रक्रियेतील मंदगती या सर्वांमुळे अनेक प्रकरणे कागदोपत्री नोंदही होत नाहीत आणि जे नोंदले जातात त्यांची तपासणी व दोषसिद्धी हळूहळू होते, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्याचा विश्वास कमी होतो. विशेषतः आर्थिक स्वरूपाचे गुन्हे ठगी, बनावट व्यवहार, फसवणूक आणि किंग-आधारित ठगी यांची वाढ ही काळजीची बाब आहे कारण ती वृद्धांच्या आर्थिक सुरक्षिततेवर थेट हल्ला करते. एनसीआरबी आणि माध्यमिक अहवालातील आकडे दाखवतात की महानगरांमधील आणि काही राज्यांमधील तज्ज्ञ प्रकारात फसवणूक आणि बनावट व्यवहार मोठ्या प्रमाणात नोंदले गेले आहेत; अनेकदा पेन्शन खाते, बँक डिटेल्स, ओटीपी किंवा विश्वासाई वाटणाऱ्या कॉल्सद्वारे पैसे हस्तांतरित करण्याची सवय वापरून अनेक वृद्ध मोठ्या आर्थिक नुकसानाला सामोरे गेले. या प्रकारच्या गुन्ह्यांचा परिणाम तत्कालीन वित्तीय नुकसानांव्यतिरिक्त दीर्घकालीन मानसिक ताण, सामाजिक शत्रुता व आत्मसन्मान घट असतो. काही प्रकरणांमध्ये कोणत्याही आर्थिक मदतीला पुनरागमन कठीण ठरते आणि वृद्धांचे जीवनमान लक्षणीयरीत्या खालावत.शारीरिक अत्याचार आणि घरगुती हिंसाचाराचे स्वरूपही व्यापक आहे; अहवालात 'साधे दुखापत' या श्रेणीतील प्रकरणांची उच्च संख्या दाखवली गेली असून, घरातील कलह, पैशांसाठीचे वाद, वारसाहक्काचे तंटे किंवा जीवनसाथी/कुटुंबातील सदस्यांद्वारे होत असलेले दुर्व्यवहार ही कारणे अनेकदा समोर येतात. विशेषतः जिथे वृद्धांची आरोग्यदृष्टीने निर्भरता जास्त असते आणि सामाजिक-पारंपरिक आधार कमी झालेला असतो, तिथे घरगुती हिंसा आणि परित्यागाचे प्रकार वाढतात.

येथे राज्यानिहाय फरकांचे निरीक्षण करणे आवश्यक आहे कारण ती समाजशास्त्रीय आणि प्रशासकीय निकष प्रतिबिंबित करतात. मध्य प्रदेशमध्ये २०२३ मध्ये नोंदवलेली ५,७३८ प्रकरणे आणि महाराष्ट्रातल्या ५,११५ प्रकरणांमधून दिसते की मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये वृद्धांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांचे प्रमाण जास्त आहे. यामागील कारणांमध्ये स्थानिक कुटुंबीय संदर्भ, आर्थिक ताणतणाव, जिल्हास्तरीय रोजगार अवस्था, शहरीकरण आणि स्थानिक पोलीस व्यवस्थेची कार्यक्षमता ह्यांचा समावेश असू शकतो. तसेच छत्तीसगडसारख्या काही राज्यांत वृद्ध हत्येचे दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असल्याचे नोंदले गेले आहे, ज्यामुळे गंभीर गुन्ह्यांचा स्थानिक पॅटर्न समजून घेणे आवश्यक ठरते. महानगरांमध्ये दिल्ली, मुंबई आणि बंगळूरु यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्धच्या प्रकरणांमध्ये उत्पन्न होत असलेले बदल आणि काही शहरांमध्ये झालेली वाढ हे सूचित करतात की शहरीकृत जीवनशैलीचा वृद्धांच्या सामाजिक सुरक्षा व सहभागावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

या परिस्थितीत सामाजिक आणि प्रशासकीय उपाय यांची गरज तातडीची आहे आणि ते उपाय बहुआयामी असावे लागतील. कायदा आणि न्यायप्रणालीच्या पातळीवर ए नोंदणीचे नियम सुलभ करणे (उदा. घरबसल्या ऋखठ नोंदणी, मोबाइल पोलीस सेवा), वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष हेल्पडेस्कची स्थापना, पोलीस प्रशिक्षणामध्ये वयोवृद्ध संवेदनशीलता समाविष्ट करणे आणि त्वरित वैद्यकीय व मानसिक सहाय्य उपलब्ध करून देणे हे प्राथमिक पावले असावीत. स्थानिक पातळीवर 'वयोवृद्ध सुरक्षा समित्या' वा 'वृद्ध सुरक्षा युनिट्स'ची स्थापना करणे जिथे समाजकार्य, पोलीस, आरोग्य व कायद्यातील प्रतिनिधी एकत्र येऊन स्थानिक समस्यांचा वेळीच शोध घेतील आणि तातडीची मदत पुरवतील अशी यंत्रणा प्रभावी ठरू शकते. आर्थिक सुरक्षेसाठी पेन्शन योजनांचे पारदर्शक व वेगवान वितरण, वयोवृद्धांना लक्षित आरोग्य विमा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम, तसेच बँक आणि नान-बँक आर्थिक संस्थांकडून वृद्धांसाठी व्यवहार पुष्टीकरणाची विशेष पद्धत लागू करणे हे देखील आवश्यक आहे. या पद्धतींमुळे सायबर-ठगी व ऑनलाइन फसवणुकीवरही परिणाम होऊ शकेल.


समाजशास्त्रीय बदल घडविणे म्हणजे दीर्घकालीन काम यासाठी माध्यमे, शाळा-शिक्षण संस्था आणि समुदाय-नियोजकांची भूमिका निर्णायक आहे. माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये 'वृद्ध सन्मान' किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल; तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले तर वृद्धाचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील. याशिवाय सामाजिक निर्बंध, कुटुंबीय दायित्वांची पुनर्बांधणी आणि आर्थिक सहभाग वृद्धांना अधिक सक्षम करतील.

महत्त्वाचे म्हणजे एनसीआरबीकडून प्रकाशित झालेली आकडेवारी ही केवळ दिशादर्शक आहे पण वास्तविकतेतील अनेक प्रकरणे नोंद न झाल्यामुळे ती पूर्ण चित्र दर्शवत नाहीत. अनेक वृद्ध सामाजिक लज्जा, कुटुंबीय दबाव किंवा आरोग्य कारणास्तव तक्रार नोंदवण्यापासून दूर राहतात; म्हणून स्थानिक स्तरावर सर्वेक्षण, नागरिक मूहांकडून गोळा केलेला अनुभव आणि स्वयंसेवी संस्थांचा डेटा धोरणनिर्मितीत समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यायोगे संख्यात्मक डेटाच्या पलीकडे असलेल्या सामाजिक वास्तवाचा अभ्यास करता येईल. तसेच दोषारोप सिद्धी आणि शिक्षा प्रक्रियेत वेग आणणे हे देखील गरजेचे आहे कारण आरोपींना योग्य वेळी शिक्षा न मिळाल्यास पुनरावृत्तीची शक्यता वाढते आणि पीडितांचा न्यायप्रणालीवरील विश्वास ढासळतो.

शेवटी, निष्कर्ष म्हणून असे म्हणता येईल की एनसीआरबीच्या ताज्या आकडेवारीने जे द्योतक दर्शविले आहेत. राज्यनिहाय फरक, महानगरांमधील धोके, आर्थिक व डिजिटल फसवणुकीची वाढ आणि घरगुती हिंसाचाराचे विषारी स्वरूप हे केवळ तात्पुरते सामाजिक प्रश्न नाहीत, तर व्यापक धोरणात्मक, प्रशासकीय आणि सांस्कृतिक हस्तक्षेपांची गरज ओळखून तीव्रपणे हाताळली पाहिजे. जर शासन, स्थानिक संस्था, बँका, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांनी समन्वित प्रयत्न केले, तर वृद्धांना केवळ कायदा आणि पोलीस संरक्षण नसून, आर्थिक सुरक्षितता, डिजिटल साक्षरता, मानसिक आरोग्य समर्थन आणि सामाजिक प्रतिष्ठा ह्या सर्व बाजूंनी बळकटी मिळू शकते. यामुळे वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता सुनिश्चित होईल आणि समाजाचे नैतिक व सामाजिक आरोग्य सुधारले जाईल. एनसीआरबीच्या अहवालाने वाजवलेली या संदर्भातील धोक्याची घंटा जर आपण ऐकली आणि धाडसाने काम केले तरच आमचे ज्येष्ठ नागरिक सुरक्षित, सन्मानित आणि सहभागी जीवन जगण्यासाठी स्वायत्त होतील; अन्यथा या आकडेवारीमागील गंभीर संकेत दीर्घकाळासाठी समाजाला मोलाचे नुकसान करू शकतात

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स





### डार्क चॉकलेट

डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील.






## विनोद

बाबू - तुझे वडील किती वर्षांचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## संदेश

Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khel-teho?
santa-mobile mai snake wala .

## सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.

- डॉन प्याट


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पुरा केलेला हिशोब, फेडलेला
४. सुखी माणसाचे वस्त्र
८. तीन पानांचे म्हणीतील झाड
१०. बोकड
१२. घाबरणे
१३. दशावतारातील त्रिविक्रम
१६. राजाचा कालावधी
१९. पौर्णिमा
२०. आजूबाजूला
२१. विषमच्या विरुद्ध
२३. मेघसारखा सावळा-श्रीकृष्ण
२५. घरातील मोठी माणसे
२७. चेहऱ्यावरील तेज
२९. युद्धात माघार न घेणारा वीर
३१. अवधान, लक्ष
३२. नवरदेव
३४. छत्रपतींचा शूर सेनापती-नेताजीचे आडनाव
३६. गरीब, निर्धन
३७. पार्वतीचे एक नाव, कजाग बाईचे विशेषण
३९. दणकट, भक्कम
४१. धन्यवाद
४२. प्रजा
४३. नक्की, खात्रीने
४४. स्पष्टवक्ता
४६. फाक, काप, तुकडा, ढीग
४८. ज्वाला, अग्नी
४९. काचेला आरसा करणारा
५०. इंग्रजीत धडा
५२. अभिनेता
५३. नम्र, वाकलेला
५५. भेदभाव
५८. ओढ्यावरील कच्चा पूल
६०. विदुराला हिणवताना केला जाणारा उल्लेख
६१. हवेतील शीतलता
६३. चीजवस्तू
६५. चकाकी
६६. जुळे
६८. हिंदीत दीर
६९. शिंका आणणारी तंबाखू
७०. दोऱ्याने सांधणारी
७१. कवाड
७२. गेरू
७३. सत्य
७४. सदोदित, वरचेवर
७७. दुसऱ्यावर केलेले उपकार
७९. हसतमुख
८०. पुष्कळ, वारेमाप
८२. नियमित यात्रेला जाणारा
८३. मत देणारा
८४. पाणी, रस

### उभे शब्द

१. झटक्यात, हा हा म्हणता
२. हात
३. शक्ती, बळ
५. औषध
६. नमस्कार
७. एक चतुर्थांश
८. पंख
९. एकूणात प्रमाण
१०. फुरसत, सवड
११. केसांची गुंतलेली बट
१४. चौक
१५. त्वरा, घाई
१७. जास्वंद
१८. या देशाच्या हरतऱ्हेच्या स्वस्त वस्तूंनी भारतीय बाजारपेठेवर अतिक्रमण केले आहे
२०. आश्रय, टेकू
२२. चाळीस शेर
२३. निवासस्थान
२४. काळसर
२५. अरण्य
२६. चटकन
२८. कष्ट, मेहनत
३०. रावणाची बहीण
३१. वजन
३३. लोखंडी वस्तू बनवणारा
३४. झाडाभोवतीचा कट्टा
३५. कारस्थान
३६. एक अप्सरा
३८. मातृभाषा
३९. पंकज
४०. वाळा
४१. सुस्ती, कंटाळा
४३. सहस्रवेळा
४४. पळून गेलेला
४५. पार्थिव
४६. आचारी
४७. झटकन
४९. पातक
५१. फायदा
५४. नेत्रसुखद, मनोहर
५५. आपलेपणा, ममता
५६. वार्ताहर
५७. डमरूच्या तालावर नाचणारे माकड
५९. श्रीकृष्णाचे वडील
६२. मुदतीचा करार
६३. वर्ष, सन
६४. भ्रम, जादू
६७. एक सुगंधी वनस्पती
६९. वाईट होण्यासंबधीच्या इच्छा, शाप
७०. पुत्र, मुलगा
७१. मध्यम प्रमाण
७२. व्यवस्था, काम
७३. पिकाचा गाळसाळ
७३अ. पाच शेरासाठी एक जुने मोजमाप
७५. वेषभूषेसह केलेली तालीम
७६. अमंगल, बीभात्स
७८. पान
७९. साद, बोलावणे
८१. आवाज, गोंगाट

### आडवे उत्तरे

१.चुकता ४.सदरा ८.पळस १०.अज १२.टरकणे १३.वामनावतार १६.राजवट १९.राका २०.आसपास २१.सम २३.घनश्याम २५.वडीलधारी २७.रया २९.रणशूर ३१.भान ३२.वर ३४.पालकर ३६.ट्रंक ३७.महामाया ३९.कणखर ४१.आभार ४२.रयत ४३.हमखास ४४.फटकळ ४६.खाक ४८.जाळ ४९.पारा ५०.लेसन ५२.नट ५३.लीन ५५.आपपरभाव ५८.साकव ६०.दासीपुत्र ६१.गारवा ६३.सामानसुमान ६५.लकाकी ६६.यमल ६८.देवर ६९.तपकीर ७१.दार ७२.काव ७३.सत ७४.वारंवार ७७.परोपकार ७९.हसरा ८०.भाराभर ८२.वारकरी ८३.मतदार ८४.द्रव

### उभे उत्तरे

१.चुटकीसरशी २.कर ३.ताकद ५.दवा ६.रामराम ७.पाव ८.पर ९.सरासरी १०.अवसर ११.जट १४.नाका १५.तातडी १७.जपा १८.चीन २०.आधार २२.मण २३.घर २४.शामल २५.वन २६.लवकर २८.यातायत ३०.शूर्पणखा ३१.भार ३३.लोहार ३४.पार ३५.कपट ३६.रंभा ३८.मायबोली ३९.कमळ ४०.खस ४१.आळस ४३.हजारदा ४४.फरार ४५.कलेवर ४६.खानसामा ४७.पटकन ४९.पाप ५१.नफा ५४.नयनरम्य ५५.अपुलकी ५६.पत्रकार ५७.भागाबाई ५९.वसुदेव ६२.वायदा ६३.सल ६४.माव ६७.मरवा ६९.तळपट ७०.सुत ७१.पासरी ७२.कारभार ७३.सरवा ७३अ.पासरी ७५.रंगीत ७६.अभद्र ७८.पर्ण ७९.हाक ८१.रव



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### वैभव सूर्यवंशी हिरोचा झिरो झाला, क्रिकेट इतिहासातली पहिलीच घटना



मुंबई-वैभव सूर्यवंशीने ऑस्ट्रेलिया दौऱ्यात धमाकेदार कामगिरी केली आहे. वैभवच्या बॅटमधून सर्वाधिक सिक्स आणि धडाकेबाज शतक आलं, पण दौरा संपत असताना वैभवने अशी चूक केली, ज्याचा विचारही त्याने कधी केला नसेल. वैभव सूर्यवंशीच्या नावावर ऑस्ट्रेलिया दौऱ्यामध्ये लाजिरवाणं रेकॉर्ड झालं आहे. ऑस्ट्रेलिया अंडर-१९ टीम विरुद्ध खेळताना दुसऱ्या यूथ टेस्टच्या दुसऱ्या इनिंगच्या पहिल्या बॉलवर वैभव आऊट झाला. याचसोबत वैभवच्या नावावर क्रिकेट इतिहासातला पहिलाच नकोसा रेकॉर्ड झाला आहे.वैभवच्या नावावर नकोसा विक्रम-वैभव सूर्यवंशी जगातला पहिला ओपनर बनला आहे, जो यूथ टेस्टच्या चौथ्या इनिंगमध्ये दुसऱ्यांदा गोल्डन डकवर आऊट झाला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या बॉलला आऊट व्हायच्या आधी वैभव याचवर्षी इंग्लंड दौऱ्यातही यूथ टेस्टमध्ये गोल्डन डकवर माघारी परतला होता. २०१० साली जो रूटही यूथ टेस्टच्या चौथ्या इनिंगमध्ये गोल्डन डकवर आऊट झाला होता. याशिवाय लाहिरु थिरिमाने, ओली रॉबिनसन हे खेळाडू

***

### मुशीर खानला मारण्यासाठी का धावला पृथ्वी शॉ? समोर आले कारण



पुणे -पुण्यात महाराष्ट्र आणि मुंबई यांच्यात झालेल्या तीन दिवसीय सराव सामन्यात मोठा वाद पेटला. महाराष्ट्र संघाकडून खेळणाऱ्या पृथ्वी शॉ आणि मुंबईचा तरुण खेळाडू मुशीर खान यांच्यात मैदानावर चांगलीच चकमक झाली. शॉ पूर्वी मुंबईसाठीच खेळत असे, पण आता संघ बदलल्यानंतर तो पहिल्यांदाच आपल्या जुन्या सहकाऱ्यांसमोर उतरला होता.

पृथ्वी शॉ आणि मुशीर खानमध्ये काय घडले?या सामन्यात पृथ्वी शॉने महाराष्ट्रासाठी खेळताना केवळ २२० चेंडूत १८१ धावांची दमदार खेळी केली. पण ७४व्या षटकात मुशीर खानच्या गोलंदाजीवर तो डीप फाइन लेगवर झेलबाद झाला. यानंतर शॉ पॅव्हेलियनकडे परतताना मुशीरनं त्याला ''थँक यू'' म्हणत स्लेजिंग केली. हा कमेंट ऐकताच शॉ चिडला आणि थेट मुशीरकडे धावत गेला.

***

### ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वीच कांगारुंचा सलग पाचवा पराभव

मॅके-भारतीय क्रिकेट संघ सध्या दिल्लीत वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याची तयारी करत आहे. त्यानंतर टीम इंडिया १९ ऑक्टोबरपासून ऑस्ट्रेलिया दौऱ्याला सुरुवात करणार आहे. या दौऱ्यापूर्वीच टीम इंडियानं ऑस्ट्रेलियन भूमीवर एक महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. दुसरी युवा कसोटी जिंकून भारतीय अंडर-१९ संघानं ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षाखालील संघाला कसोटी मालिकेत २-० असा व्हाईटवॉश दिला आहे. या विजयानं ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा शेवट सलग पाचव्या विजयानं केला.सामन्याचा निकाल दोन दिवसांत लागला : मॅके येथील ग्रेट बॅरियर रीफ अरेना इथं खेळल्या गेलेल्या दुसऱ्या युवा कसोटी सामन्यात भारतीय अंडर-१९ संघानं ऑस्ट्रेलियाचा सात विकेट्सनं पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ऑस्ट्रेलियन अंडर-१९ संघ पहिल्या दिवशी १३५ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात भारतीय संघाची कामगिरी कमी प्रभावी नव्हती. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावातही विनाशकारी पराभव झाला.

***

### टस्कर्सना ५३८ कोटी देण्याच्या निर्णयाविरोधात बीसीसीआय पुन्हा हायकोर्टात

मुंबई-आयपीएलशी संबंधित एका वादात बीसीसीआयनं पुन्हा एकदा मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावलेत. वर्ष २०१० मध्ये झालेल्या करारानुसार आयपीएलच्या चौथ्या मोसमात खेळलेल्या 'कोची टस्कर्स' टीमच्या मालकांना ५३८ कोटी देण्याचे आदेश हायकोर्टानं जारी करत याप्रकरणी आर्बिट्रेशनचा निकाल योग्य ठरवलाय. मात्र करारातील अटीशर्तींची पूर्तता न केल्यानं या फ्रँचायझीचा करार रद्द करत त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे, असा दावा बीसीसीआयनं केलाय.

यावर हायकोर्टाच्या एकलपीठानं आपला निकाल दिलाय. त्यामुळे दोन्ही बाजूंना संक्षिप्त युक्तिवाद करण्याकरिता एक एक तास दिला जाणार आहे, असं बुधवारी मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठानं स्पष्ट करत उद्या गुरुवारी दुपारी ३ वाजता यावर सुनावणी घेण्याचं निश्चित केलंय.काय आहे प्रकरण? - वर्ष २०११ च्या मोसमात आयपीएलमध्ये सहभागी झालेल्या 'कोची टस्कर्स' संघाची मालकी 'रेंदेव्हू स्पोर्ट्स वर्ल्ड' आणि 'कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेड' यांच्याकडे होती. कारवाईखाली बाहेरचा रस्ता दाखवला होता.

## ऑस्ट्रेलिया मालिकेनंतर करणार

# आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा?



**नवी दिल्ली:** क्रिकट्रॅकरने प्रसिद्ध केलेल्या एका मुलाखतीनुसार, माजी भारतीय फलंदाज आणि बंगालचे माजी कर्णधार मनोज तिवारी यांनी असा दावा केला आहे की विराट कोहलीने टेस्ट क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली कारण त्याला भारतीय संघव्यवस्थेत आदर मिळत नसल्याची भावना झाली होती. तिवारींचं मत आहे की विशेषतः रोहित शर्मालाही गेल्या आठवड्यात वनडे संघाचं नेतृत्व त्याच्याकडून काढून घेतल्यानंतर आता तसंच वाटू शकतं. तिवारी यांनी सांगितलं की रोहित शर्मा यांच्या जागी शुभमन गिलला वनडे कर्णधार बनवण्याची काहीच गरज नव्हती, कारण मुंबईचा हा फलंदाज देशाला आधीच सातत्याने यश मिळवून देत होता. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४ मध्ये टी२० वर्ल्ड कप आणि यावर्षी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती.

त्यांनी असंही मत व्यक्त केलं की सध्याच्या भारतीय संघ व्यवस्थापनाला जेष्ठ खेळाडूंचा संघावरचा प्रभाव नको आहे, त्यामुळे ते अशा खेळाडूंना हळूहळू बाहेर करत आहेत.१. तुम्ही म्हटलं की कर्णधारपद काढल्यानंतर रोहित शर्माने निवृत्ती घ्यावी. तुम्हाला वाटतं का की याचा परिणाम विराट कोहलीवरही झाला आहे?

हो, आधीच झाला आहे. नाहीतर विराट टेस्ट क्रिकेटमधून अचानक निवृत्त झाला असता का? तो इंग्लंड मालिकेसाठी मानसिक तयारी करत होता. पण भारतीय क्रिकेटमधील वातावरण आणि परिस्थितीमुळे त्याला असं वाटलं की त्याची गरज नाही किंवा त्याचा आदर होत नाही. जेव्हा एखाद्या खेळाडूला तो कितीही मोठा का असेना असं वाटतं की त्याला महत्त्व दिलं जात नाही, तेव्हा आत्मसन्मान असलेला खेळाडू पुढे खेळत नाही.विराटने शांतपणे टेस्ट क्रिकेटमधून माघार घेतली, ती नाराजीनं नव्हे, तर स्वाभिमानामुळे आणि जर हीच परिस्थिती पुढे राहिली, तर मला खरंच वाटतं की रोहितही भविष्यात हा निर्णय घेऊ शकतो कारण कोणत्याही महान खेळाडूला अशा ठिकाणी राहायचं नसतं, जिथं त्याचा आदर होत नाही.

२. शुभमन गिल आता टेस्ट आणि वनडे दोन्ही संघांचा कर्णधार आहे. तो सर्व फॉरमॅट्समध्ये नेतृत्व करणार का?हे समजायला काही अवघड नाही. त्यांचे निवेदन बघितले, तर स्पष्ट आहे क त्यांना सर्व फॉरमॅट्ससाठी एकच कर्णधार हवा आहे. म्हणजे शुभमन गिलला सर्व फॉरमॅट्सचा कर्णधार बनवायचं नियोजन सुरू आहे. पण एक प्रश्न विचारायला हवा की आत्ता बदलाची गरज काय होती? जेव्हा तुम्ही एखाद्याला कर्णधार बनवता, उद्दिष्ट असतं टीम जिंकावी. रोहित शर्मा ते सातत्याने करत होता. संघाची कामगिरी चांगली होती, निकाल मिळत होते. मग अचानक हा निर्णय का?

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी भारतीय क्रिकेटसाठी जे योगदान दिलं, त्यानंतर त्यांच्याशी असं वागणं म्हणजे एकप्रकारे अनादरच आहे. मला असं वाटतं की फार लवकरच दोघेही, विराट आणि रोहित, ऑस्ट्रेलिया मालिकेनंतर निवृत्ती जाहीर करू शकतात.



मॅसेडोनियातील स्कोप्जे येथे झालेल्या स्कोप्जे मॅरेथॉनमध्ये सहभागी होणारे सहभागी.




## प्रभु श्रीराममची करून दिली आठवण

### धनुष्यबाण... दक्षिण आफ्रिकन क्रिकेटपटूचं अनोखं सेलिब्रेशन

**नवी दिल्ली:** विश्वचषकादरम्यान क्रिकेटच्या मैदानावर एक अद्भुत दृश्य पाहायला मिळाले. दक्षिण आफ्रिकेच्या एका खेळाडूने शतक ठोकल्यानंतर भगवान रामाचे स्मरण केले. धनुष्यबाण... दक्षिण आफ्रिकन क्रिकेटपटूचं अनोखं सेलिब्रेशन; 'कपच्या मैदानावर एका अप्रतिम क्षणाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. दक्षिण आफ्रिकेची क्रिकेटपटू ताजमिन ब्रिट्स हिने शतक पूर्ण केल्यानंतर असा सेलिब्रेशन केला की भारतीय चाहत्यांनाही 'प्रभु श्रीराम'ची आठवण झाली. या वर्षी भारतात १२ वर्षांनंतर महिला वर्ल्ड कप रंगतो आहे. देशभरात सणांचा माहोल असून, नुकताच दसरा पार पडला आहे आणि दिवाळीची चाहूल लागली आहे. हे दोन्ही सण प्रभु श्रीरामांशी संबंधित आहेत. अशा पार्श्वभूमीवर ब्रिट्सचा हा सेलिब्रेशन सध्या चर्चेचा विषय बनला आहे.

शतक पूर्ण होताच ताजमिन ब्रिट्स एक गुडघ्यावर बसली आणि हातात 'अदृश्य धनुष्य' धरल्यासारखी पोझ दिली जणू काही त्या श्रीरामांसारख्या 'तीर कमान' सोडत आहेत! मैदानावरच त्यांनी केलेलं हे अनोखं सेलिब्रेशन दशर्याच्या वातावरणाशी पूर्ण जुळणारं वाटलं. सोशल मीडियावर या क्षणाचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

५ सामन्यांत ४ शतकांची कमाल

ताजमिन ब्रिट्स सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. मागील ५ वनडे सामन्यांपैकी ४ वेळा तिने शतक झळकावलं आहे. यंदाच्या वर्षात तिच्या बॅटमधून एकूण ५ शतकं आली आहेत. त्यामुळे ती महिला क्रिकेटमध्ये एका वर्षात सर्वाधिक शतकं करणारी खेळाडू ठरली आहे. हा विक्रम यापूर्वी भारताच्या स्मृती मंधानाच्या नावावर होता, जिने २०२४ मध्ये ४ शतकं झळकावली होती.

दक्षिण आफ्रिकेचा ६ विकेट्सने विजय

न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात ब्रिट्सनं केवळ शतकच ठोकलं नाही, तर आपल्या संघाला विजयाचं सोनेरी यशही मिळवून दिलं. न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करत ४७.५ षटकांत २३१ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा पहिला विकेट फक्त २६ धावांवर गेल्यानंतर ब्रिट्सनं तुफान शतकी खेळी केली. तिच्या शानदार १०० धावांच्या इनिंग्ससोबत सुने लूसच्या नाबाद ८३ धावांच्या खेळीमुळे आफ्रिकन संघाने ४०.५ षटकांत लक्ष्य गाठलं आणि सामना ६ विकेट्सने जिंकला.

या सामन्यातील अप्रतिम खेळ आणि अद्वितीय सेलिब्रेशनमुळे ताजमिन ब्रिट्सला 'प्लेअर ऑफ द मॅच'चा मान मिळाला. तिच्या या सेलिब्रेशनमुळे क्रिकेटप्रेमींनी मैदानावरच श्रीरामांच्या 'तीर-कमान'ची झलक पाहिल्यासारखं वाटलं.

# मोहम्मद शामीच्या जागी गौतम गंभीरच्या लाडक्या खेळाडूला संधी



नवी दिल्ली-भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील आगामी एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० मालिकेसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून नुकताच भारतीय संघ जाहीर करण्यात आला होता. या संघ निवडीनंतर दोन मोठे धक्के भारतीय क्रिकेटप्रेमींना बसले होते. पहिला धक्का म्हणजे एकदिवसीय संघाच्या कर्णधारपदावरुन रोहित शर्माची उचलबांगडी करुन शुभमन गिल याच्या हातात नेतृत्त्वाची धुरा सोपवण्यात आली होती. दुसरा धक्का म्हणजे भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शामी याच्याऐवजी हर्षित राणा याला संधी देण्यात आली. हर्षित राणा याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० दोन्ही संघांमध्ये स्थान मिळाले आहे. यावरुन टीम इंडियाची निवड समिती आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर बरीच टीका केली जात आहे.

नुकत्याच झालेल्या आशिया चषक स्पर्धेत हर्षित राणा याची कामगिरी अत्यंत सुमार झाली होती. श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात बुमराहला विश्रांती देऊन हर्षित राणाला मैदानात उतरवले होते. मात्र, हर्षित राणाला श्रीलंकन फलंदाजांनी चोपले होते. शेवटच्या षटकात केवळ नशीबाची साथ मिळाली म्हणून हा सामना ड्रॉ झाला होता. यानंतर हर्षित राणाला संघात घेण्यावरुन प्रचंड टीकाही झाली होती. भारताचे माजी फलंदाज श्रीकांत यांनी हर्षित राणा आणि नितीशकुमार रेड्डी यांच्यासारख्या खेळाडूंना घेऊन २०२७ च्या विश्वचषकाची संघबांधणी होत असेल तर भारताने जिंकण्याच्या आशा सोडाव्यात, असे उद्गार काढले होते. यानंतर आता भारताचा माजी क्रिकेटपटू मनोज तिवारी यानेही हर्षित राणाच्या निवडीवरुन सिलेक्शन कमिटीवर टीकास्त्र सोडले आहे.

मोहम्मद शामी याच्याऐवजी हर्षित राणाची निवड ही अत्यंत अयोग्य आहे. यापुढे निवड समितीच्या बैठकीचं थेट प्रक्षेपण झाले पाहिजे, असे मनोज तिवारीने म्हटले. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर मोहम्मद शामीला भारतीय संघात स्थान मिळालेले नाही. तर दुसरीकडे हर्षित राणा याला अनेकदा संधी देऊनही त्याची कामगिरी सुमार राहिलेली आहे. या पार्श्वभूमीवर मनोज तिवारीने निवड समिती आणि प्रशिक्षक गौतम गंभीर याच्यावर टीका करताना म्हटले की, मी या मुद्द्यावर जास्त बोललो तर वाद निर्माण होईल. हर्षित राणाने अनेक सामन्यांमध्ये जास्त धावा दिल्या आहेत. निवडकर्त्यांनी यावर लाईव्ह मिटींगमध्ये उत्तर द्यायला हवे. हर्षित राणाच्या निवडीबाबत अनेकजण चर्चा करत आहेत. हर्षित राणा आणि मोहम्मद शामी यांच्यापैकी चांगला गोलंदाज कोण आहे, यासाठी एक सर्व्हे घ्यावा. बहुतांश लोक मोहम्मद शामी हाच चांगला गोलंदाज असल्याचे सांगतील, असे मनोज तिवारी याने म्हटले.

गौतम गंभीरकडून हर्षित राणाला आतापर्यंत अनेकदा झुकते माप देण्यात आले आहे. मोहम्मद शामी याच्याकडे दुर्लक्ष का केले जात आहे? मला याचे कारण जाणून घ्यायचे आहे. आशा आहे, याचे कारण लवकर समोर येईल. मी यावर अधिक बोलू इच्छित नाही, कारण त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटेल. हर्षित राणा हा एक प्रतिभावान खेळाडू आहे, यामध्ये शंका नाही. मात्र, आतापर्यंतची कामगिरी पाहता तो महागडा गोलंदाज ठरत आहे. तरीही हर्षित राणाला मोहम्मद शामीच्या तुलनेत झुकते माप दिले जात आहे. याचे उत्तर भारतीय संघाचे प्रशिक्षकच देऊ शकतात. हर्षित राणाने भारतीय संघाकडून तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये पदार्पण केले आहे.

त्याने आतापर्यंत दोन कसोटी सामने, पाच एकदिवसीय सामने आणि तीन ट्वेन्टी-२० सामने खेळले आहेत. या प्रकारात हर्षितने अनुक्रमे ४,१० आणि ५ बळी मिळवले आहेत. ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये हर्षित राणाचा इकॉनॉमी रेट १० पेक्षा जास्त

# रोहितची कॅप्टन्सी जाताच, त्याचा हुकमी एक्काही टीमबाहेर



मुंबई -ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा होताच अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. रोहित शर्माला वनडे टीमच्या कॅप्टन्सीवरून हटवून शुभमन गिलकडे ही जबाबदारी देण्यात आली. भारताला चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनल जिंकवूनही पुढच्याच सीरिजसाठी रोहितची कॅप्टन्सी काढण्यात आली. रोहितला कॅप्टन्सीवरून हटवल्यानंतर त्याचा सगळ्यात विश्वासू आणि चॅम्पियन्स ट्रॉफीचा हिरो राहिलेल्या खेळाडूलाही बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे, त्यामुळे अनेक क्रिकेट रसिकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. वरुण चक्रवर्ती भारताच्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजयाचा हिरो होता. वरुणच्या मिस्ट्री स्पिनमुळे भारताने १२ वर्षांनंतर चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. वरुण चक्रवर्ती चॅम्पियन्स ट्रॉफीमधला भारताचा सगळ्यात यशस्वी तर स्पर्धेतला दुसरा सर्वाधिक विकेट घेणारा बॉलर होता. वरुणने ३ सामन्यांच्या ३ इनिंगमध्ये ९ विकेट घेतल्या, ज्यात त्याची बॉलिंग सरासरी १५.११ ची होती. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या एका सामन्यात वरुणने ५ विकेटही घेतल्या. चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये मिळालेल्या या विजयाचं श्रेय वरुण चक्रवर्तीने रोहित शर्माला दिलं आहे. मुंबईमध्ये ७ ऑक्टोबरला झालेल्या एएअऊ अवॉर्ड सोहळ्यात वरुण ला टी-२० इंटरनॅशनल बॉलर ऑफ द इयर देऊन गौरवण्यात आलं. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी माझी निवड होईल, असं मला वाटलं नव्हतं, पण मी रोहितचे आभार मानतो, त्याने माझ्यावर विश्वास ठेवला, तसंच त्याने मला स्वत:ला सिद्ध करण्याची संधी दिली.

वरुण चक्रवर्तीने त्याची शेवटची वनडे या महिन्यात मार्च महिन्यात खेळली. चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये न्यूझीलंडविरुद्धची मॅच वरुणची या वर्षातली शेवटची वनडे ठरली. वरुणने त्याच्या वनडे करिअरमध्ये आतापर्यंत ४ वनडे खेळल्या, ज्यात त्याला १० विकेट मिळाल्या आहेत, पण यातल्या ९ विकेट त्याने एकट्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येच घेतल्या आहेत.

वरुण चक्रवर्तीची ऑस्ट्रेलियाच्या वनडे सीरिजमध्ये निवड झालेली नाही, पण टी-२० सीरिजसाठी त्याला संधी देण्यात आली आहे. वरुण चक्रवर्तीने नुकत्याच झालेल्या आशिया कपमध्येही चांगली कामगिरी केली होती. या कामगिरीच्या जोरावर वरुण चक्रवर्ती आयसीसीच्या टी-२० क्रमवारीमध्ये पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे.



स्लोव्हेनियातील लुब्लियाना येथे ईएचएफ चॅम्पियन्स लीगमध्ये महिलांच्या सामन्यात भाग घेताना क्रिम ओटीपी ग्रुप मर्केटर आणि एफटीसी-रेल कार्गो हंगेरीच्या महिला खेळाडू.

# संपकाळातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज

## ७ वीज कर्मचारी संघटनांचा संप बेकायदेशीर; 'मेस्मा' लागू

**धाराशिव/प्रतिनिधी:**ऑक्टोबर २०२५: महावितरणमधील सात वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने दि. ९ ते ११ ऑक्टोबरपर्यंत संप पुकारला आहे. या तीन दिवसीय संपाच्या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन बुधवारी (दि. ८) पूर्ण झाले असून राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच गंभीर कारणास्तव घेतलेल्या रजा वगळून सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. रजेवरील कर्मचाऱ्यांना तातडीने कामावर रूजू होण्याची सूचना देण्यात आली आहे.

दरम्यान, व्यवस्थापनाकडून वारंवार सकारात्मक चर्चा व आवाहन करूनही संयुक्त कृती समितीने संपाचा निर्णय कायम ठेवला आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू करण्यात आल्याने हा संप बेकायदेशीर ठरला आहे.

संपकाळात नागरिकांनी वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही नकारात्मक व चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा युद्धपातळीवर रात्रंदिवस सज्ज राहणार आहे. वीजपुरवठ्याबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा व संपाच्या कालावधीत सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

खासगीकरण व पुनर्रचनेच्या मुद्द्यांवर वीज कर्मचाऱ्यांच्या ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने तीन दिवसांच्या संपाची नोटीस दिली. हा संप टाळण्यासाठी व्यवस्थापनाकडून वेळोवेळी चर्चा करण्यात आली. राज्याच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. ६०) स्वतंत्र बैठक घेऊन कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. कोणत्याही प्रकारचे खासगीकरण होणार नाही अशी निःसंदिग्धपणे ग्वाही या बैठकींमध्ये देण्यात आली.

महावितरण कंपनीचे ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास सुरवात केल्याचा आरोपही चुकीचा असल्याचे व्यवस्थापनाकडून स्पष्ट करण्यात आले. एप्रिल २०१९ नंतर तयार झालेल्या ३२९ उपकेंद्रांचे खासगीकरण करण्यात आलेले नाही. ही उपकेंद्र महावितरणच्या संबंधित कार्यालयांच्या अधिपत्याखालीच आहेत. या उपकेंद्रातील केवळ बाह्यस्त्रोत कुशल मनुष्यबळासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व त्यासंदर्भात संबंधित एजन्सींना कार्यादेश देण्यात आले. यात कोणत्याही प्रकारचे खासगीकरण नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

कर्मचारी संघटनांकडून आलेल्या मागणीनुसार प्रामुख्याने थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांमध्ये कार्यपद्धती सुधारणा करण्यात आली आहे. या कार्यालयांच्या फेररचनेत ग्राहकसंख्येनुसार अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यासाठी २ विभाग कार्यालय, ३७ उपविभाग आणि ३० शाखा कार्यालयांची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयांमुळे ८७६ अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदसंख्या देखील वाढली आहे. तर या फेररचनेत सध्या अस्तित्वात असलेल्या पदसंख्येत कोणतीही कपात होणार नाही. कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाला व आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही याची काळजी घेण्यात आल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या फेररचनेची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी सुरू झाली आहे. प्रायोगिक कालावधीत येणाऱ्या अडचणी किंवा सूचनांचा स्वीकार करून त्यानुसार अंतीम आदेश काढण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे, हेही स्पष्ट करण्यात आले.

कृती समितीच्या सर्व मागण्यांबाबत व्यवस्थापनाकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. नियमित संवाद व चर्चा करण्यासाठी दर महिन्यात प्रत्येक चौथ्या सोमवारी सर्व संघटनासोबत बैठक आयोजित करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले. तरीही संप मागे घेण्याबाबत कृती समितीकडून निर्णय होऊ शकला नाही. बुधवारी (दि. ८) दुपारी संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प) व श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. अतिवृष्टी व पूरपरिस्थितीच्या तसेच सणासुदीच्या पार्श्वभूमिवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी संप करू नये असे आवाहन केले. मात्र त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

त्यानंतर संचालक श्री. तालेवार व श्री. पवार यांनी राज्यभरातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते व वरिष्ठ अधिकाऱ्यांची व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संपकालीन उपाययोजना व तयारीचा आढावा घेतला. यावेळी कार्यकारी संचालक श्री. धनजंय औंढेकर, श्री. परेश भागवत, श्री. दत्तात्रेय पडळकर, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

संपात सहभागी झाल्यास कारवाईचा इशारा - वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांची कोणताही गैरसोय होऊ नये यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू केलेला आहे. त्यामुळे महावितरणमधील २३ पैकी ७ वीज कर्मचारी संघटनांची तब्बल तीन दिवसांचा संप बेकायदेशीर ठरला आहे. ज्यांची सेवा एक वर्षापेक्षा कमी झाली आहे किंवा ज्यांची नुकतीच थेट भरती प्रक्रियेत निवड झाली आहे ते संपात सहभागी झाल्यास त्यांची सेवा तात्काळ संपुष्टात येणार आहे. तसेच सुरवातीचे तीन वर्ष कंत्राटी म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा, संपात सहभागी झाल्यास रद्द होणार आहे. सेवेमध्ये नियमित झालेले कर्मचारी सेवेत सहभागी झाल्यास त्यांच्या सेवेत खंड देण्याच्या कारवाईची तरतूद आहे. आपत्कालिन नियोजन व पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध- या तीन दिवसीय संप काळासाठी महावितरणकडून आपत्कालीन व्यवस्था उभारण्यात आली आहे. यामध्ये मुख्यालय व क्षेत्रीय परिमंडल कार्यालयांमध्ये स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. दर तासाला राज्यातील वीजपुरवठ्याची स्थिती वरिष्ठ अधिकारी व मुख्यालयास कळविण्यात येणार आहे.

संपकाळात प्राधान्याने सुरळीत वीजपुरवठ्यासाठी पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येत असून संपात सहभागी नसलेले महावितरणचे कर्मचारी, बाह्य स्त्रोत कर्मचारी, महावितरणच्या निवड सूचीवरील कंत्राटदार व कर्मचारी यांची सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्थानिक कार्यालय, उपकेंद्र आदी ठिकाणी तात्पुरत्या नियुक्ती करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांच्या कंत्राटदारांना अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी करण्यात आली आहे. या सर्वांसाठी वाहन व्यवस्था व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. याबाबतच्या लेखी सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

रोहीत्र, वीजवाहिन्यांसह इतर साधनसामुग्री उपलब्ध- संपकाळामध्ये सुरळीत वीजपुरवठ्यासाठी सर्व क्षेत्रीय विभाग कार्यालयांच्या निवडसूचीवर असलेल्या सर्व कंत्राटदारांना आवश्यक साधनसामुग्री, मनुष्यबळ व वाहनांसह संबधीत कार्यालयांमध्ये उपलब्ध राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सोबतच महावितरणकडून वितरण रोहीत्र, ऑईल, वीजतारा, केबल्स, वीजखांब, फिडर पिलर्स, डिस्ट्रीब्यूशन बॉक्सेस, वाहतुकीसाठी वाहने आदी आवश्यक साधनसामुग्री महावितरणच्या विविध कार्यालयांमध्ये उपलब्ध ठेवण्यात आली आहे.

घरगुतीसह अत्यावश्यक क्षेत्रात वीजपुरवठ्याची खबरदारी- संपकाळात प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसह पाणी पुरवठा योजना, रुग्णालये, मोबाईल टॉवर्स, शासकीय कार्यालये आदींचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याची विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. ज्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला त्या ठिकाणी सर्वप्रथम पर्यायी व्यवस्थेतून (बॅकफिड) वीजपुरवठा सुरू करण्यात येईल.

येथे साधा कधीही संपर्क- संपकाळात वीजसेवा देणारे अभियंते व कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. वीजपुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांसाठी मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ हे टोल फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहेत. तसेच धाराशिव जिल्हयातील वीजग्राहकांनी ७८७५२११६१५ या कंट्रोल रूमला संपर्क करावा

# महिला बचत गटाच्या स्वतंत्र कार्यालयासाठी लवकरच जागा उपलब्ध करून देणार - सौ. संजीवनीताई कराड



**लातूर/प्रतिनिधी:** बुधवारी महिला कुठेच मागे नाहीत विविध क्षेत्रात मोठी झेप घेत आहेत. घेतलेल्या कर्जाची परतफेड शंभर टक्के महिला बचत गट करतात. या बचत गटाच्या अडीअडचणीची सोडवणूक व्हावी, नियमित एकमेकांशी संवाद साधून प्रगती साधता यावी यासाठी महिला बचत गटासाठी स्वतंत्र कार्यालयासाठी आमदार रमेशआप्पा कराड साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून जागा उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही सामाजिक कार्यकर्त्या भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी दिली.

महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र रेणापुर या संस्थेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात बुधवारी भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी माविम विभागीय सल्लागार संदीप मराठे, जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे, जिल्हा ग्राम उद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे, आयसीआयसी बँकेचे राहुल लोंढे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या मेघा कुलकर्णी, एचडीएफसी बँकेचे भारत काळे, भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, संगायोचे समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे शरद दरेकर, दशरथ सरवदे, सावित्रीबाई फुले साधन केंद्राच्या अध्यक्षा सरस्वती पवार, उपाध्यक्षा अनुसया फड, व्यवस्थापक उषा डुमणे त्याचबरोबर अच्युत कातळे, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, सुरेखा पुरी, शीला आचार्य, उज्वल कांबळे, राजकुमार आलापुरे, रवींद्र नागरगोजे, श्रीमंत नागरगोजे, अंतराम चव्हाण, नारायण राठोड, उत्तम चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती. या वार्षिक सर्वसाधारण सभेत साधन केंद्रा अंतर्गत येणाऱ्या सभासद बचत गटाच्या असंख्य महिला आवर्जून उपस्थित होत्या. महिलांना कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात त्यासाठी प्रत्येक महिलांनी स्वस्थ राहण्यासाठी स्वतःची त्याचबरोबर कुटुंबाची काळजी घ्यावी असा मौलिक सल्ला देऊन बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी सक्षम व्हावे असे सांगून यावेळी बोलताना सौ. संजीवनी ताई कराड म्हणाल्या की, राज्यातील महायुती शासनाने महिलांसाठी अनेक योजना जाहीर करून महिलांना सन्मान देण्याचे काम केले आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंना उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर निश्चितपणे प्रयत्न केले जात आहेत या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित मान्यवरांनी विविध विषयाच्या अनुषंगाने महिलांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर याप्रसंगी वार्षिक अहवाल पुस्तकेचे प्रकाशन आणि यशस्वी उद्योजक महिलांचा सन्मान करण्यात आला. सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र रेणापूर यांच्या अंतर्गत ४३२ महिला बचत गट असून या बचत गटा अंतर्गत ४७५२ महिला जोडल्या गेल्या आहेत. प्रारंभी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत साधन केंद्राच्या कार्यकारणी संचालक महिलांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्राचे सर्व पदाधिकारी क्षेत्रीय कर्मचारी यांनी मेहनत घेतली. या वार्षिक सर्वसाधारण सभेत हजारोंच्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# खते, कीटकनाशकांवरील जीएसटी त्वरित शून्य करा.. पंतप्रधानांकडे

## राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांची मागणी



**लातूर (मोईज सितारी)-** केंद्र सरकारने जीएसटी दराच्या रचनेत बदल केला. कृषीशी संबंधित उपकरणांच्या जीएसटी दरात कपात केली. परंतु, महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी खते आणि कीटकनाशकांवरील जीएसटी शून्य करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

प्रधानमंत्री कार्यालयाला पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने २२ सप्टेंबर रोजी जीएसटी दरात कपात केली. जीएसटी दराच्या रचनेत केलेल्या बदलानुसार ट्रॅक्टर, ट्रेलर, टायर्स आणि इतर कृषी उपकरणांवर दरकपात केली आहे. परंतु, ही उपकरणे आणि कृषी वाहनांच्या खरेदीचा सरळ लाभ देशातील केवळ पाच टक्के शेतकऱ्यांपर्यंतच मर्यादित आहे. जे शेतकरी यांत्रिकीकरणाचा उपयोग करतात त्यांनाच हा लाभ मिळू शकतो. परंतु, देशातील ६० कोटी शेतकरी लहान घटकातील आहेत.

त्यांना तत्काळ आणि सरळ लाभमिळावा, यादृष्टीने खते व कीटकनाशके आदी अँग्रीकल्चर इनपुटवर जीएसटी दर शून्य करण्याची मागणी करण्यात आली आहे. खतावर जीएसटीचा सध्याचा दर ५% कीटकनाशके सध्याचा दर १८% आहे कृषीसाठी लागणारी खते आणि कीटकनाशके तसेच इतर खर्चावर लागणारा जीएसटी शून्य केल्यास शेतीचा उत्पादन खर्च कमी होईल. या निर्णयाचा देशातील ६० कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळू शकेल. शेतकऱ्याऱ्यांना सशक्त बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. खते आणि कीटकनाशकांवरील जीएसटी शून्य केल्यास शेतकऱ्यांना फायदा होईल.अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी पंतप्रधानांना केली आहे.

# लातूर जिल्हा पोलीस दलातर्फे २९ वी लातूर जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** याबाबत अधिक माहिती अशी की, लातूर पोलीस दलामध्ये कार्यरत पोलीस अधिकारी अमलदारांमध्ये असलेल्या खेळाडू वृत्तीला चालना देण्यासाठी, त्यांच्यातील कलागुणांचा विकास होण्यासाठी पर्यायाने त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्याकरिता पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशान्वये व अध्यक्षतेत २९ वी लातूर जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२५ चे लातूर पोलीस दलाच्या पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजन करण्यात आले आहे.

सदरचे स्पर्धा या ०९ ऑक्टोंबर ते ११ ऑक्टोंबर असे ०३ दिवस चालणार असून या स्पर्धेमध्ये लातूर जिल्ह्यातील एकूण १२५ पोलीस अधिकारी/अमलदार खेळाडू भाग घेणार असून ते विविध २९ क्रीडा प्रकारात आपले नैपुण्य दाखविणार आहेत.

सदरच्या स्पर्धेमध्ये लातूर पोलीस दलातील महिला खेळाडूंचा पण सहभाग मोठ्या प्रमाणावर असणार आहे. या स्पर्धेमधून सर्वोत्कृष्ट खेळाडूंची परीक्षेत्रीय स्पर्धेसाठी निवड होणार आहे.

# प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वेने सोलापूर-धर्मवरम साप्ताहिक विशेष गाड्यांच्या मार्गात अनकापल्ली पर्यंत विस्तार केला

**सोलापूर/प्रतिनिधी** प्रवाशांच्या मागणीनुसार, रेल्वेने सोलापूर-धर्मवरम (पूर्वी तिरुपतीपर्यंत) साप्ताहिक विशेष गाड्यांचा मार्ग अनकापल्ली पर्यंत वाढवला आहे. सोलापूर आणि अनकापल्ली दरम्यान ८ अतिरिक्त साप्ताहिक विशेष गाड्या चालवल्या जातात त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

**सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष (८ फेऱ्या)** - ०१४३७ साप्ताहिक विशेष ट्रेन सोलापूरहून ०९.१०.२०२५ ते २७.११.२०२५ पर्यंत दर गुरुवारी रात्री ११:२० वाजता निघेल आणि तिसऱ्या दिवशी दुपारी १:०० वाजता अनकापल्ली येथे पोहोचेल. (४ सेवा) - ०१४३८ साप्ताहिक विशेष ट्रेन ११.१०.२०२५ ते २९.११.२०२५ पर्यंत दर शनिवारी अनकपल्ली दुपारी ५:३५ वाजता निघेल आणि सोलापूरला तिसऱ्या दिवशी सकाळी १०:३० वाजता पोहोचेल. (४ सेवा)

**थांबे:** कुर्डुवाडी,बार्शी टाऊन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अदोनी, गुंतकल, अनंतपूर, धर्मवरम, कदिरी, मदनपल्ली रोड, पीलेर, पाकाला, तिरूपति, रेणिगुंटा, श्री कालहस्ती, गुडूर, नेल्लूर, ओंगोल, चीराला, तेनाली, विजयवाड़ा, एलुरु, ताडेपल्लीगुडेम, निडदवोलु, राजमंड्री, सामलकोट, अन्नवरम और एलमंचिली **रचना:** १ एसी-II टियर, १ एसी-III टियर, ११ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास आणि २ सामान-कम-ब्रेक व्हॅन (१९ कोच) आरक्षण आणि बुकिंग: विशेष गाड्या क्रमांक ०१४३७/०१४३८८ च्या पुढील प्रवासासाठी विशेष भाड्याने आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. अनारक्षित कोच स्थानकांवर बुकिंग काउंटरवर आणि णढड ॲपद्वारे देखील बुक करता येतात.

# विद्यार्थ्यांना स्कुल किट वाटप मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व 'टच' संस्थेचा हृदयस्पर्शी उपक्रम

**धाराशिव (जिमाका):** जिल्ह्यात झालेल्या अलीकडच्या मुसळधार पावसामुळे परांडा तालुक्यातील देवगाव,वडनेर, वागेगव्हाण व लाहोरा या गावांमध्ये भीषण पूरस्थिती निर्माण झाली.या पुराच्या पाण्यात घरे,गुरेढोरे,शाळा तसेच विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे साहित्य वाहून गेले.गावोगाव दुःखाचे सावट पसरले होते. अशा कठीण प्रसंगी जिल्हा मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पुढे आला व त्यांनी बाधितांना मदतीचा हात दिला.याच पार्श्वभूमीवर,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) श्री.मनेश खंडागळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत,'टच - टर्निंग अपॉर्च्युनिटीज फॉर अपलिफ्टमेंट अँड चाइल्ड हेल्प' (मुंबई) या स्वयंसेवी संस्थेने एक हृदयस्पर्शी उपक्रम राबविला.

या उपक्रमांतर्गत पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलवण्यासाठी व त्यांच्या शिक्षणाला पुनरुज्जीवित करण्यासाठी ३८६ विद्यार्थिनी-विद्यार्थ्यांना शालेय साहित्याने युक्त 'स्कूल किट' वाटप करण्यात आले.या वेळी 'टच' संस्थेचे श्री.उमाकांत पांचाळ व सहकाऱ्यांनी लाभार्थी मुलांशी थेट संवाद साधून त्यांना आत्मविश्वासाने आणि नव्या उमेदीनं शिक्षण सुरू ठेवण्याचे प्रोत्साहन दिले. हा उपक्रम कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरज मोटे, टच बालग्राम संस्थेचे विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी श्री. तुकाराम डोलारे आणि श्री.महारुद्र नक्षे यांच्या सहकार्याने पार पडला.

या उपक्रमामुळे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवे बळ,आत्मविश्वास आणि आशेची नवी किरण मिळाली. हे केवळ शालेय किटचे वाटप नसून त्यांच्या उद्याच्या भविष्यासाठी उभारलेला एक दृढ विश्वासाचा पूल ठरला आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखानाच्यावतीने दीपावली निमित्त सभासदांसाठी सवलतीच्या दरात साखर



धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना लि. केशेगाव यांच्यावतीने दीपावली निमित्त सभासदांसाठी सवलतीच्या दरात प्रति किलो ३० रुपये प्रमाणे २५ किलो प्रति शेअर्स साखर वाटप शुभारंभ आज दिनांक ०७/१०/२०२५ रोजी सुनील प्लाझा धाराशिव येथे करण्यात आला.

यापरसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दिलीपराव पाटील साहेब मा. पोलीस निरीक्षक, व लक्ष्मीकांत वसंतराव जाधव अध्यक्ष व्यापारी संघटना धाराशिव यांच्या शुभहस्ते कारखाना सभासद किसन हरिबा शिंदे यांना पहिले साखर पोते देऊन शुभारंभ करण्यात आला.

यापरसंगी संचालक ड.श्री. चित्राव गोरे साहेब , ड. निलेश अण्णा बारखडे पाटील साहेब, तसेच युवराज वीरसेन राजे निंबाळकर, येयाती पत्तेसिंह देशमुख , पुष्पकांत माळाळे, मनोज तीर्थकर, वैजनाथ शिवाप्पा गुळवे जयंत शिंदे, बाळासाहेब मैरान, , बब्रुवान रावण पवार, व कारखान्याचे कर्मचारी बी व्ही वाघमारे, लोमटे, एम आर , पडवळ एस व्ही, पाटील टी एच, मंडलिक जी जे, गोरे डी यु यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# प्राण्यांची निर्दयपणे कत्तल करुन गोमांसची विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

मुरुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत इसाक अली इस्माईल नदाफ, वय २८ वर्षे, रा. नेहरुनगर मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी मुरुम मोड महालिंगरायवाडी शिवारात मुरुम ते मुरुम मोड रोडवर रिक्षा मध्ये २१७ किलो वजनाचे गोवंशीय जातीचे जनावरांचे मांस एकुण ४३,४०० किंमतीचे वाहनासह ७३,४०० किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरांचे मांस विक्री करण्यासाठी जवळ बाळगलेला मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी नमूद व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंदवला आहे.

# एनव्हीपी शुगरची अल्पावधीत उत्कर्षाकडे झेप - संदीपान महाराज हासेगावकर



धाराशिव (प्रतिनिधी)-एनव्हीपी शुगर या कारखान्याने अल्प कालावधीत सूक्ष्म नियोजन आणि शेतकऱ्यांचा विश्वास या बळावर उत्कर्षाकडे झेप घेतली आहे, असे प्रतिपादन

आळंदी देवाची येथील वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व परीक्षक संदीपान महाराज हासेगावकर यांनी केले.

धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि. या कारखान्याच्या द्वितीय गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी (दि. ५) संदीपान महाराज हासेगावकर आणि जनता बँकेचे अध्यक्ष हभप वसंतराव नागदे यांच्या हस्ते कारखाना स्थळी करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागजी येथील प्रगतशील शेतकरी रंगनाथ सावंत, तर प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी, माजी नगराध्यक्ष तथा शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर, कडकनाथवाडी येथील विश्वनाथ पाटील, लेखा परिक्षक सचिन शिंदे, टेंभुर्णी येथील स्वराज ट्रॅक्टरचे वितरक हिम्मतराव पाटील, उमरगा-लोहारा विधानसभेचे युवा नेते अजिंक्य बाबा पाटील हे उपस्थित होते.

हासेगावकर महाराज म्हणाले की, कारखान्याचे चेअरमन नानासाहेब पाटील हे उद्योग क्षेत्रात जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणे काम करत आहेत, त्यामुळेच कारखान्याची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. संत गोरोबा काकांच्या भूमीत औद्योगिक प्रगती पाहून समाधान वाटते. कारखान्याची पुढील काळात भरभराट होवो, असे शुभाशीर्वाद त्यांनी यावेळी दिले.

**चेहरा आणि चारित्र्य पाहूनच कारखाना चालतो - वसंतराव नागदे**

वसंतराव नागदे यांनी, साखर कारखाना हा चेहरा आणि चारित्र्य पाहूनच चालत असतो असे सांगून विश्वास नसला तर शेजारी कारखाना असला तरी शेतकरी त्यांना ऊस न देता दूरच्या कारखान्याला ऊस देतो असे ते म्हणाले. एनव्हीपी शुगरच्या वतीने शेतकऱ्यांना वेळेवर बिल दिले जाते याचा आनंद वाटतो. ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू होत नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांची प्रगती होणार नाही. चेअरमन नानासाहेब पाटील यांच्या अनुभवामुळे यावर्षीचा गळीत हंगाम आणखी चांगला होईल असेही त्यांनी सांगितले.

**एनव्हीपी शुगरची टॉपच्या कारखान्यात नोंद होईल आ. प्रवीण स्वामी**

आमदार प्रवीण स्वामी म्हणाले, साखर कारखाना म्हटले की आपण पश्चिम महाराष्ट्राकडे बघतो. पण आता मराठवाडा विशेषतः धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील काही कारखान्यांनी आदर्श साखर कारखाना कसा असावा याचे उदाहरण इतर कारखान्या समोर ठेवले आहे. त्यातीलच एक म्हणजे एनव्हीपी शुगर हा कारखाना आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस कारखान्याला गेला की लवकर बिल मिळावे ही अपेक्षा असते. शेतकऱ्यांची ही गरज लक्षात घेऊन एनव्हीपी शुगरने अवघ्या पंधरा दिवसांत बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून आदर्श घालून दिला आहे. त्यामुळे एनव्हीपी शुगरची पुढील काळात टॉपच्या कारखान्यात नोंद होईल असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**एनव्हीपी शुगरचे नियोजन चांगले - मकरंद राजेनिंबाळकर**

मकरंद राजेनिंबाळकर म्हणाले, एनव्हीपी शुगर गेल्या तीन वर्षांपासून शेतकऱ्यांसाठी तत्परतेने काम करत आहे. आपण महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांची पाहणी केली. त्या कारखान्यांच्या तुलनेत एनव्हीपी शुगरचे नियोजन चांगले दिसून येते. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांची लक्ष्मी नांदते. तो भाग स्वच्छ आणि सुंदर असला पाहिजे यावर कारखान्याचा भर आहे. पुढील काळात चेअरमन नानासाहेब पाटील यांचे नियोजन अधिक प्रभावी होईल. राजे साहेबांच्या परिवारातील हा पहिला कारखाना असून लवकरच आपण बार्शी तालुक्यात कारखाना सुरू करत आहोत, तो राजे साहेबांच्या परिवारातील दुसरा कारखाना असेल, असेही ते म्हणाले.

**कार्यक्रम टाळून खासदार अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीला**

गळीत हंगामाच्या शुभारंभ कार्यक्रमाला निमंत्रित करण्यात आलेले खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी कार्यक्रम टाळून कालच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्तांना मदतीसाठी धावून गेले. त्यांच्या या कर्तव्यदक्ष कामगिरीचा उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात कौतुक करून गौरवोद्गार काढले.

# हवामानावर आधारित फळपिक विमा योजना : शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची संधी

धाराशिव (जिमाका)- हवामान बदलामुळे फळपिकांना सतत धोका निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे संरक्षण करण्यासाठी हवामानावर आधारित फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे.जिल्ह्यासाठी अंबे बहारात द्राक्ष,मोसंबी,केळी,डाळिंब,आंबा व पपई या फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे.

ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी लागू असून,कर्जदार शेतकऱ्यांनी जर सहभाग नको असेल तर त्यासाठी नोंदणीच्या अंतिम तारखेच्या एक दिवस आधी बँकेकडे घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा त्यांचा सहभाग बंधनकारक समजला जाणार आहे.

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अवेळी पाऊस,कमी-जास्त तापमान,सापेक्ष आर्द्रता,वेगवान वारे व गारपीट अशा हवामान धोक्यांपासून संरक्षण मिळणार आहे.बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून त्यासोबत आधारकार्ड,७/१२ उतारा,फळबागेचे अक्षांश-रेखांश, फोटो व बँक पासबुकची प्रत जोडणे आवश्यक आहे.

**विमा हप्ता व अंतिम मुदती**

द्राक्ष - हप्ता ६३५० रुपये,अंतिम दिनांक : १५ ऑक्टोबर २०२५. मोसंबी - हप्ता नियमित१६५० रुपये अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर,डाळिंब -२६५० रुपये,केळी - २८५० रुपये, अंतिम दिनांक :३१ ऑक्टोबर २०२५.आंबा -२८५० रुपये.अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५.पपई -६५० रुपये. अंतिम दिनांक :३१ ऑक्टोबर २०२५ आहे.

**अधिसूचित महसूल मंडळे**

हवामानावर आधारित फळपिक विमा योजना : धाराशिव जिल्ह्यातील फळपिकनिहाय अधिसूचित महसूल मंडळे जाहीर केली आहे.

पपई - धाराशिव ग्रामीण, केशेगाव,कळंब, ईटकूर, येरमाळा, मोहा, शिराढोण, गोविंदपूर,तुळजापूर, सावरगाव, सलगरा दि.,ईटकळ, जळकोट,मंगरुळ,नळदुर्ग,आरळीबु., तामलवाडी, परंडा,आसु,जवळा नि., सोनारी, आनाळा,पाचपिंपळा, शेळगाव, भूम, वालवड, माणकेश्वर, अंभी, ईट, वाशी, तेरखेडा,पारगाव व पारा.आंबा पिकासाठी जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळे समाविष्ठ आहे.

केळी पिकासाठी उमरगा, दाळीब, नारंगवाडी मुळज, मुरूम, बलसूर, बेडगा, धाराशिव शहर, धाराशिव ग्रामीण,बेबळी, केशेगाव, पाडोळी, तेर, ढोकी, जागजी, करजखेडा, येडशी, अंबेजवळग,कळंब, ईटकूर, येरमाळा, मोहा, शिराढोण, गोविंदपूर, तुळजापूर, सावरगाव, सलगरा दि., ईटकळ, जळकोट, मंगरुळ, नळदुर्ग, आरळी बु,तामलवाडी, परंडा, आसु, जवळा नि., सोनारी, आनाळा, पाचपिंपळा, शेळगाव, भूम,वालवड, माणकेश्वर, अंभी,ईट,लोहारा, माकणी,जवेळी,धानुरी,वाशी, तेरखेडा,पारगाव,पारा. दाळीब पिकांसाठी उमरगा, दाळींब, नारंगवाडी, मुळज, मुरुम, धाराशीव शहर, धाराशीव ग्रामीण, बेंबळी, केशेगाव, पाडोळी,तेर,ढोकी,जागजी, करजखेडा, येडशी,अंबेजवळगा, कळंब, ईटकुर, येरमाळा, मोहा, शिराढोण,गोविंदपूर,मस्सा, नायगाव, तुळजापूर, सावरगाव,सलगरा दि.ईटकळ, जळकोट, मंगरूळ, नळदुर्ग, आरळी बु, तामलवाडी, परंडा, आसू,जवळा नि,सोनारी, आनाळा पाचपिंपळा,शेळगाव, भूम,वालवड,माणकेश्वर,अंबी, ईट, आष्टा, लोहारा,माकणी, जेवळी, धानोरी,वाशी,तेरखेडा, पारगाव व पारा यांचा समावेश आहे.

द्राक्ष पिकासाठी उमरगा,दाळींब, नारंगवाडी, मुळज, मुरुम, धाराशीव शहर, धाराशीव ग्रामीण, बेंबळी, केशेगाव,पाडोळी,तेर, ढोकी, जागजी, करजखेडा, येडशी,अंबेजवळगा, कळंब, ईटकूर, येरमाळा, मोहा, शिराढोण, गोविंदपूर, तुळजापूर, सावरगाव, सलगरा दि.ईटकळ, जळकोट, मंगरूळ,नळदुर्ग,आरळी बु, तामलवाडी, परंडा, आसू जवळा नि , सोनारी, आनाळा, पाचपिंपळा, शेळगाव, भूम, वालवड, माणकेश्वर, अंबी, ईट, आष्टा, लोहारा, माकणी, जेवळी, धानोरी, वाशी, तेरखेडा, पारगाव व पारा या महसूल मंडळांचा समावेश आहे.

मोसंबी पिकासाठी शिराढोण, तुळजापूर, सावरगाव,सलगरा दि.,ईटकळ, जळकोट, मंगरुळ, नळदुर्ग, आरळी बु., तामलवाडी, धाराशिव ग्रामीण, तेर, ढोकी, जागजी, परंडा,आसु, जवळा नि.,सोनारी, आनाळा,पाचपिंपळा,शेळगाव, माणकेश्वर,अंबी,वालवड,ईट,लोहारा,वाशी,तेरखेडा,पारगाव व पारा या महसूल मंडळांचा समावेश करण्यात आला आहे.

विविध महसूल मंडळांतील शेतकऱ्यांचा समावेश असून, पपई, डाळिंब,मोसंबी व केळी उत्पादक बहुसंख्य महसूल मंडळात या योजनेचा लाभ घेता येईल.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी आवाहन केले आहे की,अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपले फळपिक हवामानाच्या जोखमीपासून सुरक्षित करावे. योजनेबाबत अधिक माहितीसाठी www.pmfbsy.gov.in या संकेतस्थळावर किंवा नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे यांच्या शोधनिबंधास आंतरराष्ट्रीय परिषदेत उत्कृष्ट शोधनिबंधाचे पारितोषिक



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे यांना दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे सपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये उत्कृष्ट शोधनिबंधाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

६ ऑक्टोबर २०२५ रोजी इंग्लिश एज्युकेटर सोसायटीच्या वतीने डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर आधारित आंतरराष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक राज्यातून आणि देशभरातून संशोधक उपस्थित झाले होते.दिवसभर शोधनिबंधाचे सादरीकरण या चर्चासत्रा मध्ये झाले आणि साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा जागर त्या ठिकाणी झाला.

प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे हे अर्थशास्त्र विषयाचे सुप्रसिद्ध लेखक असून त्यांनी ३४ पुस्तकाचे लेखन केले आहे.विविध आर्थिक विषयांवर त्यांनी अनेक वेळा वर्तमानपत्रातून लेख लिहिले आहेत त्यांना अनेक वेळा विविध पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे.

याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्य शुभांगी गावडे , मुख्यकार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभ गावडे, कोल्हापूर विभागप्रमुख श्री श्रीराम साळुंखे , मराठवाडा सहविभागप्रमुख डॉ.जयसिंगराव देशमुख , रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# माजी सैनिक विश्रामगृहात तात्पुरत्या सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी मुलाखत

धाराशिव दि.८ ऑक्टोबर (जिमाका) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या माजी सैनिक विश्रामगृह, धाराशिव येथे अशासकीय सफाई कर्मचारी पद तात्पुरत्या स्वरूपात (रोजंदारी) एकत्रिक मानधनावर भरावयाचे आहे.

या पदासाठी माजी सैनिक,त्यांची विधवा तसेच नागरी संवर्गातील पात्र उमेदवार अर्ज करू शकतात.

इच्छुकांनी आपल्या मूळ कागदपत्रांसह व शैक्षणिक प्रमाणपत्रांसह ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे हजर राहावे.मुलाखत त्याच दिवशी घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी दिली आहे.

# डिकसळ येथे कोजागरी पौर्णिमेनिमित्त बैलगाड्या ओढण्याची ५७ वर्षाची परंपरा

डिकसळ(प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील डिकसळ येथे कोजागरी पौर्णिमेनिमित्त मंगळवारी आयोजित करण्यात आलेला बारा बैलगाड्या ओढण्याचा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. बोराडे घराण्याच्या तिसऱ्या पिढीतील मानकरी भारत बोराडे यांनी माणसांनी खचाखच भरलेल्या बारा बैलगाड्या ओढताच 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषाने आसमंत दणाणून गेला. गेल्या ५७ वर्षांपासून सुरू असलेली ही अनोखी परंपरा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

नवरात्र उत्सवाचा भाग म्हणून डिकसळ येथील तुळजाभवानी मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याच उत्सवात कोजागरी पौर्णिमेला होणारा हा सोहळा पंचक्रोशीतील नागरिकांसाठी एक मोठी पर्वणी असतो. मंगळवारी सकाळी या सोहळ्याचे मानकरी भारत बोराडे यांना हळद लावण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर गावातून हलगीच्या तालावर त्यांची सुमारे चार तास वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. दुपारी तीनच्या सुमारास मूळ कार्यक्रमाला सुरुवात झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव अंबिरकर,अंकुश अंबिरकर, रामचंद्र बोराडे, भास्कर बोराडे, सुजित बोराडे, अनंत बोराडे, दासु गायकवाड, अनिकेत जाधव, ऋतुराज बोराडे, यश जाधव दिगांबर खंदारे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

तिसरी पिढी जपतेय परंपरा डिकसळ येथील ही परंपरा गेल्या छप्पन वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे. सुरुवातीला दादाराव बोराडे यांनी ही परंपरा सुरू केली आणि तब्बल ३५ वर्षे त्यांनी गाड्या ओढल्या. त्यांच्या पश्चात त्यांचे धाकटे बंधू लक्ष्मण बोराडे यांनी आठ वर्षे हा वारसा जपला. आता गेल्या बारा वर्षांपासून त्यांची तिसरी पिढी म्हणून भारत बोराडे ही परंपरा पुढे नेत आहेत.


# लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649